ई/४५२

(४)

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक २, शक १९०६

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 2, October, 1984

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरु झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधीची निरनिराळया भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक २, शक १९०६

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 2, October, 1984

~~ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाकडून या अंकासाठी त्यांच्या नियमानुसार अनुदान मिळाले आहे.~~

वार्षिक वर्गणी–रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

भा. इ. सं. मं त्रैमासिक ६३ : २, ऑक्टोबर १९८४

चौथाई आणि चौथाई-कूल

गो. त्र्यं. कुलकर्णी

पुणे

काही दिवसांपूर्वी हैद्राबाद येथील दप्तरखान्यातील शाहजहानकालीन फार्सी कागदपत्रे पहात असताना मला चौथाई–कूल यासंबंधी काही कागद सापडले. चौथाई कूल ही दक्षिणेत नेमलेल्या मुघली मनसबदारांच्या वतनांच्या महसुलातून अथवा जहागिरींच्या उत्पन्नातून वसूल केली जात असे. काही प्रसंगी चौथाई–कूलचे अधिकार हे मुघली मनसबदारांना बहाल केल्याचेही दिसून येते. उपरोक्त कागदांपैकी फक्त एक कागद 'Selected Documents of Shahjahan's Reign' या पुस्तकात छापलेला असून, बाकीचे कागद अप्रसिद्ध आहेत.

या कागदपत्रांतील मजकुरामुळे चौथाई आणि चौथाई–कूल हे काय असावे याविषयी माझे औत्सुक्य जागृत झाले. तसेच चौथाई–कूल आणि पारंपरिक अर्थाने आपण ज्याला चौथ म्हणतो, त्यांचा परस्परांशी काही संबंध आहे का असा प्रश्न मनात आला. या दोन्ही गोष्टींचा विचार करण्याची कालमर्यादा प्रस्तुत लेखात मात्र १७ व्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकापर्यंतचीच घेतलेली आहे. त्यांचा विचार करीत असताना, चौथाईचा उगम मराठापूर्व कालापर्यंतच नव्हे, तर पोर्तुगीजपूर्व कालापर्यंत जाऊन पोहोचतो, असे दिसून आले.

प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांवरून व ग्रंथांवरून असे दिसून येते की, शिवाजीच्या उदयापूर्वीदेखील चौथ अस्तित्वात होती, आणि या चौथाईचा संबंध केवळ मराठ्यां-पुरताच मर्यादित नव्हता. सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्या मतानुसार, हल्लीच्या धर्मपूर राजाचा पूर्वज एक लहानसा रजपूत–प्रमुख असून, तो दमणच्या पोर्तुगीज प्रजेकडून चौथ वसूल करीत असे.[1] त्यांच्या मतानुसार चौथाईचा उगम मराठापूर्व कालात आहे. हे निश्चितपणे सिद्ध करण्याइतका पुरावाही उपलब्ध आहे. आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी डॉ. सेन लिहितात की, असरसेटाचा राजा व दमणचा पोर्तुगीज कॅप्टन यांच्यात १२ मार्च इ. १६३५ या दिवशी चौथाईचे पैसे देण्यासंबंधी एक करार झाला. या कराराचे नूतनीकरण इ. १६७० व १७१९ या वर्षी झाले. याच संदर्भात ते आणखी एका तहाचा उल्लेख करतात. हा तह इ. १५७९ मध्ये झाला होता. तेव्हा त्यांच्या मतानुसार, चौथाईचा उगम हा जास्तीत जास्त

अगोदर म्हणजे इ. १५७९ मध्ये झाला असून, दमणचे प्रजाजन ही चौथाई रामनगरच्या राजास इ. १७१९ पर्यंत देत होते.[२]

गोव्याचे प्रसिद्ध इतिहास–संशोधक कै. डॉ. पिसुर्लेकर यांच्या मते, चौथाईचा उल्लेख सर्वांत अगोदर ' क्रॉनिक डयूस सुसेशूस द दुरेन द गुजराती ' ह्या पोर्तुगीज हस्तलिखितात आलेला आहे. ह्या हस्तलिखिताचा काळ इ. १५३५ असून, ते बिब्लिऑटिका नॅशनल द लिस्बॉ येथे आहे.[३] यावरून असे दिसते की, डॉ. सेन यांनी दाखवून दिलेल्या काळापेक्षा (१५७९) आपण आणखी मागे जातो. गोवे दप्तरात ' तोंबो द दमॉव ' नावाचे एक हस्तलिखित आहे. हे हस्तलिखित इ. १५९२ मध्ये लिहिलेले असून, त्यामध्ये चौथाईविषयी आणखी बरेच बारकावे आलेले आहेत.[४] फादर मॅन्युअल गोजीनो याच्या प्रवासाच्या रोजनिशीच्या आधारे डॉ. पिसुर्लेकर लिहितात की, चौथिया राजास दमण भागातून पसाव नावाचा एक कर मिळत असे. त्यास ' चौथ ' म्हटले जात असे. त्याचे वैशिष्टय असे की, दमणचा हा भाग अजून पोर्तुगिजांच्या ताब्यात पूर्णपणे आलेला नव्हता.[५] यावरून असे दिसून येते की, चौथाईचा उगम हा मराठा–पूर्व कालातीलच नसून पोर्तुगीज–पूर्वकालातीलही आहे.

चौथाईचे मूळ हे जमीनदाराच्या जमिनीतील महसुली उत्पन्नाशी अपरिहार्यपणे निगडित आहे. याचे जास्तीत जास्त जुन्या काळातील उदाहरण गुजराथमधील जमीनदारांसंबंधीचे आहे, असे प्रा. इरफान हबीब 'मिरात–इ–अहमदी' या ग्रंथावरून सांगतात. या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे जमीनदाराची जमीन दोन भागांत विभागलेली असे. पहिल्यास तलपद अथवा त्रिपद म्हणजे ३ / ४ आणि दुसऱ्यास बांठ म्हणजे १/४ असे म्हटले असून, पहिल्या भागाचे उत्पन्न हे सरकारजमा होत असे व दुसऱ्या भागातील उत्पन्नावरती जमीनदाराचा अधिकार असे.[६] परंतु पिसुर्लेकरांच्या मते, गुजराथच्या सुलतानाने दमण जिंकून घेतल्यानंतर तेथील रजपूत राजा अथवा सारसेटाचा राजा दमणच्या रहिवाशांकडून १/४ इतके महसुली उत्पन्न घेऊ लागला. इ. १५५९ मध्ये जेव्हा पोर्तुगिजांनी हा भाग काबीज केला तेव्हादेखील राजाने या भागातून पूर्वपरंपरा म्हणून उपर्युक्त कराची वसुली केली.[७] यावरून असे दिसून येते की गुजराथेत चौथाईचा उगम आधीच्या काळात जाऊन पोहोचतो.

आतापर्यंत आपण चौथाईचा उगम आणि आणि तोही पश्चिम किनारपट्टी आणि गुजराथ या भागात केव्हा झाला हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. आता थोडेसे मुघलांच्या आधिपत्याखाली असलेल्या हिंदुस्थानच्या भागाविषयी बघू या. प्रा. इरफान हबीब यांच्या मते, ' संपूर्ण मुघली साम्राज्यातील जमीनदारांचा त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवरती एक आर्थिक हक्क होता. यास उत्तर भारतात आणि बंगालात मालिकान, गुजराथेत बांठ आणि दक्षिणेत चौथ असे म्हटले जाई.'' [८] जमीनदारांच्या या आर्थिक हक्कास मुघली सरकारने केव्हा मान्यता दिली याबद्दल नक्षितपणे काहीही सांगणे अवघड आहे. या बाबतीत सर्वसाधारणपणे १७ वे शतक

अथवा १६ व्या शतकाचा उत्तरार्ध इतकेच मागे जाऊन सांगता येईल. परंतु दक्षिणेत मात्र या बाबतीत आम्हास बहमनी काळापर्यंत पोहोचता येते. पेशवे दप्तरातील ३१ व्या खंडातील जमाव विभागातील कागदांत यासंबंधी एक कागद उपलब्ध झालेला असून, तो सिद्दी मलिक अंबरच्या दिवाणाच्या व काजी मख्दुम याच्या शिक्क्याचा आहे. त्यात असे म्हटले आहे की, " भिवराव वलद इबन देवजी सावंत देशमुख तपे वाडे चवऱ्यासी गाव व सरकार जुनर सुभे बेदर अमीर उमराव हाजूर बोलावून हुकूम फर्माविला की भिवर नेहरात मवासी राजा आहे. तो त्या मुलकात मवासी करितो. मुलकाचा पैसा दरोबस्त भीमेपासून देत नाही. तमाम अमीर उमराव यास हुकूम फर्माविला की जो अमीर राजा बाटेराव याजला मोडून मुलकाचा अमल घेऊन येईल त्यास चौथाई अमल देशमुखी दिधला. अमीर उमराव कोणी विडा न घेतला. भिवराव सावंत हुजूर जाऊन उभा राहिला की खानजाद आपला म्हणवितो आहे. खानजादास परवाना वहाल करणे. "[९]

सदर कागद अपूर्ण असल्यामुळे पुढे नेमके काय घडले ते सांगता येणे कठीण आहे. या कागदाची तारीख १० मोहरम सुहूर सन ८२७ (११ नोव्हे. इ. १४२६) ही आहे. यावरून असे वाटते की खुद्द दक्षिणेत तरी चौथाईचा उगम हा १५ व्या शतकाच्या सुरुवातीस झालेला असावा. परंतु या काळातील यासंबंधीचे आणखी कागद उपलब्ध नसल्यामुळे असे निश्चितपणे प्रतिपादन करणे थोडेसे अवघड आहे. वर उल्लेखिलेला कागद म्हणजे कदाचित् प्रसंगानुरूप केलेला एखादा करारही असू शकेल. परंतु त्यातील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे एखादी विशिष्ट कामगिरी करण्या-बद्दल उत्पन्नाचा चौथाई भाग त्या व्यक्तीला देणे ही होय. आणि त्यास चौथ या नावानेच संबोधिले आहे. अशाच प्रकारची प्रथा बहमनी अथवा निजामशाही काळातही चालू असावी.

त्याचप्रमाणे चौथाईचे वैशिष्ट्य, त्याचे प्रकार आणि त्याची दक्षिणेत झालेली वाढ यासंबंधी थोडेसे विवेचन आवश्यक आहे. डॉ. सेनांच्या मते, सारसेटाच्या राजास दमणचे रहिवाशी जी चौथ देत होते त्याच्या मोबदल्यात त्या प्रदेशाचे चोरांपासून रक्षण करणे तसेच तेथील गुरे, माणसे पकडून न नेणे याविषयीचे बंधन त्या राजावर होते. ज्या प्रांतातून चौथ वसूल होत होती त्या विभागातील लोकांना राजापासून पूर्ण संरक्षण मिळत असे.[१०]

चौथाई अथवा चौथ म्हणज १/४ भाग असे समजले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र असे नव्हते. त्याच्या प्रमाणात खूप फरक पडलेला दिसतो. ' The variation was downwards and never upwards ' या डॉ. सेनांच्या मताशी पिसुर्लेकर सहमत आहेत. परंतु पिसुर्लेकर आणखीही काही माहिती पुढीलप्रमाणे सांगतात. त्या माहितीनुसार इ. १६७० मध्ये तारापूर आणि माहीम या परगण्यां-तून चौथाईच्या वसुलाचे प्रमाण १४ आणि १२॥ टक्के याप्रमाणे होते.[११] लिस्बन

येथील एका हस्तलिखितावरून असे दिसून येते की, इ. १६८३ मध्ये दमण येथील चौथाईचे वार्षिक उत्पन्न ६४८७॥ होते, पैकी वतनदारीचा खर्च १९४९ वजा जाता चौथिया राजास ४५३८॥ मिळाले.[१२] प्रा. इरफान हबीब यांच्या मते, गुजराथेत जमीनदारी गावांची दोन भागांत विभागणी केली जात असे. पैकी बांठ या विभागाचे उत्पन्न जमीनदारास दिले जाई, तर तळपद याची वसुली सरकारमार्फत होत असे.[१३] बांठ म्हणजे जमीनदाराच्या मालकी हक्कापैकी जमिनीतील काही भाग. आणि अशा ह्या भागावर मुघली अधिकारी उत्पन्नाचा १/४ भाग पोरबंदर आणि काठेवाड येथील किनारपट्टीवरील जमीनदारांस देत असत. सारांशाने याची व्याप्ती म्हणजे, जमीनदाराचा जमीन ठेवण्याचा जो हक्क त्या हक्काबद्दल उच्चश्रेणीतील अधिकाऱ्यांनी कनिष्ठांना द्यावयाचा मोबदला, भत्ता, अथवा कनिष्ठाने उत्तम सेवा केली त्याबद्दल त्याला द्यावयाचे एक प्रतीक असे समजावे लागेल. चौथाईविषयी इतर बाबतीत प्रा. इरफान हबीब हे सेनांशी सहमत आहेत.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की, चौथ म्हणजे जामीनदाराचा त्याच्या ताब्यातल्या जमिनीतील उत्पन्नाच्या १/४ भागावर असलेला हक्क. मुघली राज्यव्यवस्थेत यास मान्यता प्राप्त झालेली असून, अशा प्रकारच्या हक्काबद्दल कधी रोख तर कधी इतर प्रकारे त्या त्या प्रांतातून येणाऱ्या उत्पन्नातून त्याची (जमीनदाराची) भलावण केलेली दिसते. काही वेळेस त्याने मुलकी चाकरी उत्तम प्रकारे बजावली म्हणून देखील त्याचा हा हक्क मान्य केलेला दिसतो. आतापर्यंतच्या पहाणीचा एकंदर निष्कर्ष असा की जमीनदारास त्याच्या ताब्यात असलेल्या जमिनीतून निघणाऱ्या उत्पन्नातून १/४ इतके उत्पन्न राज्याधिकारी देत असत. मुघलांच्याच बाबतीत सांगावयाचे म्हणजे १७ व्या शतकात महसुली उत्पन्नासंबंधी त्यानी एक निराळा प्रकार अवलंबिलेला दिसतो. विशेषतः या प्रकारची वसुली दक्षिणेत नेमलेल्या मुघली सेवेतील मनसबदारांच्याकडून केली जात असे. यासच मुघली कागदपत्रांतून चौथाईकूल असे म्हटलेले आहे. मुघली अधिकाऱ्यांचा तनखा हा रोख अथवा त्यांना नेमून दिलेल्या जहागिरींतून होत असे.[१४] अबुल फजल मामुरीच्या मते, दक्षिणी मनसबदाराच्या तनख्यातून त्याच्या तलबेच्या १/४ भाग हा तत्कालीन दक्षिणेतील कानूजाबत्याप्रमाणे वसूल केला जात असे.[१५] दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, आपल्या अधिकाऱ्यांच्या मनसबीच्या उत्पन्नातून काही महसूल गोळा करणे ही मुघलांची अधिकृत पद्धती दिसते. अशा प्रकारची ही पद्धत दक्षिणेत नेमलेल्या मनसबदारांच्या बाबतीत शाहजहानच्या काळात विशेषेकरून सर्रास अंमलात आलेली दिसते.[१६] प्रा. आसार अली म्हणतात की दक्षिणेत ज्यांना मनसब आणि चाकरी देण्यात आलेली होती त्या सर्वांना ही कपात सहन करावी लागत असे.[१७]

वरील सर्व विवेचन लक्षात घेतल्यानंतर अभ्यासकाच्या मनात काही प्रश्न उभे राहतात. पहिला प्रश्न म्हणजे उपर्युक्त वसूल ही महसुली वसुली आहे की पगारातून

होणारी ही सर्वसाधारण कपात आहे ? तसे असेल तर त्यास चौथाई–कूल असे क म्हटले आहे ? दुसरा प्रश्न असा की, अबुल फजल मामुरी म्हणतो त्याप्रमाणे मनसबदाराच्या जागिरीतील मुकररा तलब ही कपात खरोखर १/४ इतकी होती कां ? तिसरा प्रश्न, अशा प्रकारची कपात दक्षिणेत नेमलेल्या मुघली सेवकांच्या दक्षिणेत असलेल्या जहागिरीनाच लागू होती किंवा कसे ?

या विषयावरील प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध कागदांचा विशेष अभ्यास व्हावयास पाहिजे. माझ्या अभ्यासावरून मला असे वाटते की, मुघली सेवेतील दक्षिणेत नेमलेल्या मनसबदारांकडून अशा प्रकारे १/४ उत्पन्न सक्तीने वसूल केले जात होते. परंतु त्यांतील १/४ भाग, जो उत्पन्नातून वसूल केला जात असे, तो नेहमीच मुकररा तलब अथवा नेमून दिलेल्या उत्पन्नाचा असेल असे नव्हे, तर तो भाग म्हणजे तलबेच्या रकमेतून, रसद-इ-खुराक, इरमास इत्यादि बाबींवर होणारा खर्च वजा करून उरलेल्या रकमेचा १/४ भाग असावासे दिसते, आणि मनसबदाराच्या उत्पन्नातून अशा रीतीने वसूल केलेल्या चौथ्या भागास चौथाई-कूल असे या फार्सी कागदपत्रांत म्हटले आहे. उदाहरणच द्यावयाचे म्हटले तर पुढील कागद पहा. यांत शाहजहानच्या ६ व्या जुलूस [१८] वर्षात महाबतखानाच्या मार्फतीने एक याददाश्त बादशहास सादर करण्यात आली. त्यात इतर अधिकाऱ्यांच्या बरोबर, यशवंतराय मानाजी आणि इतर चार दख्खनी मनसबदारांची नावे असून, त्यांना जहागीर देण्यात आलेली होती. सदरहू जहागिरीच्या उत्पन्नातून काही वसुलीच्या बाबी होत्या. पैकी इर्मास म्हणजे सैन्यास लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा (Military Supplies), हत्तीस लागणारा खुराक (रसद-इ-खुराक) आणि चौथाई-कूल म्हणजे जागिरीतील उत्पन्नाचा १/४ भाग. यातील नेमका उल्लेख असा :

यशवंतरायाची मनसब	३००० जात	२०००	स्वार
वार्षिक तनख्याची जागीर		२,३१,४४,०००	दाम
पैकी वजा हत्तीस लागणारा खुराक		२,६०,४००	दाम
	शिल्लक	२,२८,८३,६००	दाम
पैकी वजा चौथाई-कूल		५७,२०,९१०	दाम
		१,७१,६२,६९०	दाम

यावरून असे स्पष्ट दिसते की, त्याच्या जागिरीच्या एकूण उत्पन्नातून हत्तीस खुराक इ. सरकारी मागण्यांची वजावट होऊन उरलेल्या उत्पन्नाचा चौथाई भाग हा चौथाई-कूल म्हणून घेतलेला आहे. म्हणजे चौथाई-कूल याचा शब्दशः अर्थ घेणे बरोबर होणार नाही. कुल म्हणजे एकूण. या शब्दामुळे आपला थोडासा गैरसमजही संभवतो. म्हणजे मग डॉ. आसार अलींच्या म्हणण्याप्रमाणे मनसबदाराच्या दोन्ही प्रकारच्या मनसबी (सवार आणि जात) यांच्यावरून प्रथम त्याचा तनखा काढून नंतर एकूणातून एकचतुर्थांश वजा करून, उरलेल्या बाबतीत फक्त रोख तनखा अथवा

जागीर दिली जात असे. यास 'वजा-इ-दाम-इ-चौथाई' [१९] असे संबोधिले आहे. परंतु हे तितकेसे बरोबर दिसत नाही. कारण प्रत्यक्षात कागदावरती हिशोबाची जी वजावट दाखविली आहे ती यापेक्षा भिन्न दिसते.

वरील विधानावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे, यशवंतराय यास मुघलांनी जागीर दिली आणि त्याच्या मोबदल्यात त्याने ह्या सरकारास सत्तावन्न लाख वीस हजार नऊशे दहा दाम इतकी चौथाई-कुलाची रक्कम देण्याचे मान्य केले. त्याच्याचप्रमाणे इतर चार मनसबदारांनी देखील चौथाई-कूलची रक्कम देण्याचे मान्य केले.

आतापर्यंतच्या विवेचनावरून आणि उदाहरणांवरून आम्हास असे दिसून येते की, मनसबदाराच्या जागिरीतून चौथाई-कूलची रक्कम सरकार वसूल करून घेत असे. परंतु काही कागदपत्रांतून मात्र याउलट उल्लेख आढळून येतात. तेथे, चौथाई-कूलची रक्कम त्या मनसबदारास देऊन टाकण्यात आली आहे.

शाहजहानच्या १६ व्या जुलूस वर्षातील पुढील [२०] घटना आहे. खंडेराय वल्द पिलाजी, मन्सबदार, १००० जात, ६०० स्वार, यास परगणे महागाव, सरकार माहूर येथील ६७ लाख दामांची वार्षिक उत्पन्नाची जागीर देण्यात आली. त्याच्या अगोदर त्याला परगणे वाशीम येथील ५० लाख २५ हजार दामांची जागीर दिलेली होती. त्यानंतर चिंचोली परगण्यातून १६ लाख ७५ हजार दामांची जागीर त्यास देण्यात आली. सदर जागीर ही अहमदखान घोरी या मुसलमान मनसबदाराची असून ती त्याजकडून काढून घेऊन खंडेरायास देण्यात आली. त्याला ११ लाख ७५ हजार दाम हा चौथाई कूलचा वसूल आकारण्यात आला. परंतु सदरील रक्कम ही ४७ लाख दामांच्या १/४ आहे. म्हणजे त्याच्या हिशेबासाठी अधिकृतरीत्या त्याचे उत्पन्न ६७ लाखांचे न धरता फक्त ४७ लाखांचे धरण्यात आलेले आहे. व असा शेरा मारण्यात आला आहे की उरलेली रक्कम (म्हणजे ६७ लाखांपैकी) ५५ लाख आणि २५ हजार दाम हे चौकशीअंती तनख्यासाठी म्हणून देण्यात आले आहेत.

चौथाईसह ही एकूण रक्कम ६७ लाख दाम आहे. यानंतर असा शेरा मारला आहे की, चौथाईचा ऐवज हा चौकशीअंती त्याला देऊन टाकण्यात आला आहे.

या कागदातील मजकुरावरूत एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे, चौथाई-कूलची रक्कम मनसबदाराकडून वसूल करण्याऐवजी त्यास देऊन टाकण्यात आली आहे. याचा नेमका अर्थ काय ? मनसबदारास चौथाईचा वसूल देण्यासंबंधी सूट दिली होती असा अर्थ होतो की काय याबद्दल उपर्युक्त कागदांतून नेमके असे काही सांगता येत नाही. कदाचित् असेही असू शकेल की मनसबदाराविषयी विशेष मर्जी दाखविण्यात आली. किंवा असेही म्हणता येईल की मनसबदाराला चौथाईचे उत्पन्न ठेवून घेण्याचे अधिकार बहाल करण्यात आले.

सदरहू कागदांतून आलेल्या मजकुराचा विशेष अभ्यास झाला पाहिजे. विशेषतः वहिवाटीने अथवा परंपरेने चालत आलेली चौथ अथवा चौथाई आणि या कागदांतून जे समान उल्लेख येतात त्यांचा तौलनिक अभ्यास व्हावयास पाहिजे. दोन्ही बाबतीत उत्पन्नाचा चौथा भाग आणि मनसबदाराच्या जागिरीतून त्याची वसुली असा अर्थ अभिप्रेत आहे. दोन्हीही बाबतीत, सदर मनसबदाराने सेवाचाकरी केली म्हणून त्याला ही बाब लागू करण्यात आली आहे. परंतु यातील साम्य येथेच संपते. उपर्युक्त कागदपत्रांतून आलेल्या माहितीवरून असे वाटते की मुघल काळातील चौथाई-कूल यात दर्शविलेला भाव अथवा आशय हा जमीनदाराच्या चौथाईच्या हक्कापेक्षा बराच निराळा असून, चौथाई-कूलचा संबंध फक्त दक्षिणेत नेमलेल्या मुघली मनसबदारांच्या तनख्यांशीच आहे, आणि त्यांच्या जागिरीतून एक चतुर्थांश भागाचे उत्पन्न वसूल केले जाई.

तसेच दक्षिणेत नेमलेल्या मनसबदारांसाठी असलेल्या कानूजाबत्याप्रमाणे- सदरची कपात ही इतर कपातीप्रमाणे, म्हणजे हत्तीचा खुराक, अथवा सैनिकी सामानाचा पुरवठा यासारख्या मान्यवर कपातींप्रमाणेच गणली जात असे. परंतु चौथाई, बाबत मात्र असे म्हणावे लागेल की तो जमीनदाराचा एक अधिकार असून, त्यास मुघली राज्यकर्त्यांनी मान्यता दिली होती. कारण संबंधित जमिनीची मालकी त्या जमीनदाराची होती. जरा वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, चौथाई-कूलची आखणी मनसबदारी पद्धतीच्या धर्तीवरती असून, मनसबदारास एखाद्या परगण्याचे उत्पन्न, त्याने चाकरी करावी या उद्देशाने लावून दिलेले असून, त्यातून ती वसुली केली जाई आणि त्यामुळे त्याची जागीर अथवा मनसब ही केव्हाही बदलली जात असे. परंतु चौथाईचे स्वरूप मात्र याउलट होते. तिचा उगम जमीनदारी पद्धतीत झालेला असून, जोपर्यंत जमीनदाराकडे विशिष्ट जमीन असे, तोपर्यंत त्या उत्पन्नातील जमीनदाराचा हक्क अबाधित राहात असे. आणि त्यामुळेच त्याच्या या हक्काल कधीच धक्का लागू शकत नसे. दक्षिणेतील मनसबदारांवर मात्र चाकरीचे बंधन असून, त्यांस मनसबी देण्यात आल्या. याप्रीत्यर्थ आपल्या जागिरींतील उत्पन्नाचा काही भाग सरकारला द्यावा लागत असे. आता दक्षिणेतील मनसबदारांनाच हा कायदा का लागू करण्यात आला याबद्दल मात्र निश्चित स्वरूपाचे काहीही सांगता येत नाही. डॉ. आसार अली यांच्या मतानुसार अशा प्रकारची कपात एका विशिष्ट वर्गातून केली जात असे. हे मान्य करण्यासारखे आहे. पण त्याची कारणे मात्र देण्यास ते असमर्थ दिसतात. याचे एक कारण दिसते ते असे–शाहजहानच्या उत्तरकालात, दक्षिणेतील महसुलाची हासील (वसुली) आणि अंदाजे महसूल जमा यांचे जे आकडे काढण्यात येत असत त्यामध्ये खूपच तफावत पडत जात होती. त्यामुळे महसुली उत्पन्नातील ही तफावत भरून काढण्यासाठी, फक्त दक्षिणेतील मनसबदारांवरतीच अशा प्रकारे चौथाई-कूल वसुलीचे नियम लागू केलेले असावेत.

थोडक्यात म्हणजे, पारंपरिक पद्धतीने आकारण्यात येणारी चौथाई आणि मुघली काळात मनसबदारांकडून वसूल करण्यात येणारी चौथाई-कूलची आकारणी अथवा कर हे अनेक तऱ्हेने भिन्न होते असे दिसते. आणि आकारणीसंबंधी त्यांचे परस्पर कुठलेही नाते दिसून येत नाही. तसेच दक्षिणेतील मुघली मनसबदारांच्या महसुलातून अथवा त्यांना दिलेल्या जागिरींतून, हत्तीस लागणाऱ्या खुराकासाठी वजावट अथवा रसदेबद्दल येणाऱ्या खर्चाची केलेली कपात समजू शकते. परंतु त्यांच्या नेमलेल्या उत्पन्नातून १/४ भाग (चौथाई-कूलचा) कशासाठी कापून घेऊन सरकारात जमा करावयाचा हे मात्र प्रस्तुतच्या कागदपत्रांवरून समजू शकत नाही. त्यांचा कार्यकारणभाव नेमका काय असावा ? तसेच परस्पर-विरोधी अशी दुसरी एक गोष्ट आहे. ती म्हणजे, काही वेळेस या मनसबदाराना चौथाई-कूलची वजावट माफ करण्यात आलेली असून, त्यांनी तो वसूल परस्पर करण्यास सरकारने मान्यताही दिलेली दिसते. तेव्हा अशा प्रकारचा अधिकार मुघली मनसबदारास मिळाल्यास त्याला नेमक्या कोणत्या वर्गात (Category) बसवायचे, असे काही प्रश्न वरील कागदपत्रांवरून उत्पन्न होतात. अशा प्रकारच्या आणखी कागदपत्रांचा शोध घेऊन या विषयावर अधिक प्रकाश पाडणे आवश्यक आहे.

■ ■

Chauthai and Chauthai-Kul

Summary

This article is based on original unpublished Persian documents during Shah Jahan's period from the Hyderabad State Records Office. In these documents, there are references to Chauthai-Kul, which was, according to the Mughal custom, deducted from the total income of the jagirs assigned to the mansabdars of the Deccan.

Taking a survey of the theories propounded by Surendra Nath Sen, Pandurang Pissurlencar and Prof. Irfan Habib regarding the origin of Chauth or Chauthai, the present article attempts to show that the traditional Chauth or Chauthai was a product of pre-Portuguese period. This Chauthai was different from Chauthai-Kul, which was specially opplicable to the Mughal mansabdars of the Deccan.

Chauthai was a right enjoyed by the Mughal jagirdars of the North, which had a legal sanction of the Mughal emperors. This was because the ownership of land was of the jagirdars or jamindars. Contrary to this, Chauthai-Kul was related to the mansabdari system. Usually the mansabs were assigned to the mansabdars in lieu of military or other services to the Mughal State. The amount of Chauthai-Kul was deducted by the State from the total income of the jagir of the mansabdar. While the lands of jamindars permanently belonged to them, the mansabs of the Mughal mansabdars in the Deccan were subject to confiscation or transfer by the State.

संदर्भ आणि टीपा

१. सुरेंद्रनाथ सेन, **मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज** (१९२८), पृ. २८.
२. **कित्ता**, पृ. ३३–३४
३. पांडुरंग पिसुर्लेकर, **पोर्तुगेझ–मराठा संबंध** (१९६७), पृ. ७९.
४. **कित्ता**, पृ. ७९. विधानाच्या पुष्ट्यर्थ पिसुर्लेकर गोवा येथील दप्तरखान्यातील क्र. ७५९९ च्या हस्तलिखिताचा आधार देतात.
५. **कित्ता**, पृ. ७९. लेखक रिलीकॉ, लिस्बन, १९४४ चा आधार देतो तळटीप पृ. २४ वर.
६. इरफान हबीब, **दि ॲग्रेरियन सिस्टीम ऑफ मुघल इंडिया** (१९६३), पृ. १४७.
७. पिसुर्लेकर, **पोर्तुगेझ–मराठा संबंध**, पृ. ८०.
८. हबीब, **दि ॲग्रेरियन सिस्टीम ऑफ मुघल इंडिया**, पृ. १४९, १५०.
९. गो. स. सरदेसाई (संपा.), **पेशवे–दप्तरातील निवडलेले कागद** (१९३३), खं. ३१, क्र. १.
१०. सेन, **मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज**, पृ. ३४.
११. पिसुर्लेकर, **पोर्तुगेज–मराठा संबंध**, पृ. ८०.
१२. **कित्ता**, पृ. ८३. लेखकाने ह्या विधानाच्या पुष्ट्यर्थ बिब्लिऑटिका द अजुंदा, लिस्बो, कर्टस द इंडिया (हस्तलिखित क्र. ३१–९––१) चा आधार दिला आहे.

१३. हबीब, **दि ॲग्रेरियन सिस्टीम ऑफ मुघल इंडिया**, पृ. १४२-४३.
१४. एम्. आसार अली, **दि मुघल नोबिलिटी अंडर औरंगजेब** (१९६६), पृ. ३.
१५. **कित्ता**, पृ. २७.
१६. **कित्ता**, पृ. २७.
१७. **कित्ता**, पृ. २८.
१८. **सिलेक्टेड डॉक्युमेंट्स् ऑफ शहाजहान्स रेन** (१९५०), पृ. २, डॉक्युमेंट क्र. १, दि. २७ रमजान, जुलूस ६, १०४३ हिजरी (१७ मार्च, १६३४)
१९. एम्. आसार अली, **दि मुघल नोबिलिटी अंडर औरंगजेब**, पृ. ५०.
२०. पर्शियन डॉक्युमेंटस, क्र. २४९ आणि २५० (अप्रकाशित), आंध्रप्रदेश आर्काइव्हज्, हैद्राबाद. ह्या कागदांवर अनुक्रमे २८ आणि २९ जमादि. २, १६ जुलूस शाहजहान वर्ष (१३ आणि १४ सप्टेंबर १६४२-३) अशी तारीख दिलेली आहे.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : २, ऑक्टोबर १९८४

शिवकालीन वेठबिगार

ना. गो. भवरे
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्राचीन काळापासून मध्ययुगीन कालापर्यंत चालत आलेल्या ऐतिहासिक वारशातील अनेक अनिष्ट सामाजिक रूढींमध्ये वेठबिगार (Forced Labour) म्हणजे विनावेतन काही कालपर्यंत काम करून घेण्याच्या प्रथेचा समावेश होतो. शिवकालांत (१६३०–१७०७ इ. स.) महाराष्ट्रांत स्वराज्यस्थापना झाली आणि मराठी माणसाची राजकीय गुलामगिरी संपुष्टात आली. तथापि, स्वराज्यातील स्वातंत्र्यफळे चाखण्याचे खरे भाग्य समाजात हीन समजल्या जाणाऱ्या अनेक जातींच्या नशिबी आले नव्हते; कारण त्यांना वेठबिगारी-सारख्या सामाजिक आणि आर्थिकदृष्टया अवहेलना करणाऱ्या अनिष्ट संस्थांना बळी पडावे लागत होते. प्रस्तुत निबंधात शिवकालातील वेठबिगारीचा समकालीन अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधाराने परामर्श घेण्याचे योजिले आहे.

वेठबिगार संस्थेमागील भूमिका :

प्राचीन भारतातील राज्यांत गरीब कारागीर आणि शूद्र जातींकडून कर-वसुलीऐवजी काही दिवस विनावेतन सेवा करून घेण्याच्या प्रथेला " विष्टी " म्हणत. प्राचीन भारतात ही प्रथा सार्वत्रिक असल्याचे आढळते. ह्या संस्थेचा उगम नागरिकांनी स्वतःच्या संरक्षणासाठी राजाला आणि त्याने स्थापन केलेल्या सरकारला कराऐवजी सेवा देण्याच्या प्रथेमधून झालेला आढळतो. आपल्या प्रजेचे परकीय आक्रमणे, देशांतर्गत दंगली, चोऱ्या, दरवडे यापासून संरक्षण करणे हे राजाचे कर्तव्य असते; आणि ते काम योग्य रीतीने करण्यासाठी सेनादले, पोलिसदले, न्यायालये आणि इतर आवश्यक सेवासंस्था उभारण्याची जरुरी असते. या सेवा चालविण्यासाठी लागणारा पैसा करांच्या रूपाने उभा करावा लागतो. अशा रीतीने आपल्या प्रजेच्या जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करणे हे जसे राजाचे कर्तव्य ठरते, तसेच, अशी कामे राजाला करता यावीत म्हणून ठरलेले कर सरकारला देणे प्रजाजनांचे कर्तव्य ठरते. याच भूमिकेतून प्रत्येक सरकार आपल्या प्रजाजनां कडून सक्तीने करवसुली करीत असते आणि कर चुकविणाराला शिक्षा करते.

तथापि, देशातील सर्वच प्रजाजनांकडून करवसुली करणे सरकारलाही शक्य होत नाही, कारण काही प्रजाजन गरीब असतात आणि पैशाने कर भरणे त्यांना शक्यच होत नाही. अशा वर्गात प्रामुख्याने गरीब हुन्नरवंत, कारागीर आणि शूद्रातिशूद्र यांचा समावेश होतो. वस्तुतः, अशा दरिद्री वर्गांना सरकारच्या सर्वच करांपासून सूट मिळावयास पाहिजे होती, आणि ते अधिक न्याय्य झाले असते. परंतु सरकारच्या संरक्षणाची गरज ज्या अर्थी सर्वांनाच असते, त्या अर्थी अशा संरक्षणाला लागणाऱ्या खर्चाचा भाग सर्वांनीच आपापल्या शक्तीनुसार उचलला पाहिजे, हे तत्त्व सर्वमान्य झालेले दिसते. त्यानुसार गरीब वर्गांनी सरकारचे कर पैशाच्या रूपाने देण्याऐवजी त्यांच्या ठराविक सेवेच्या रूपाने अथवा बनविलेल्या वस्तूंच्या रूपाने देण्याची एक पद्धत बनविण्यात आली. तिलाच वेठबिगार म्हणतात. वेठबिगार ही कर भरण्याला पर्यायी पद्धत असल्याने तिची वसुली सक्तीने करण्यात येत होती. कर चुकविणारांना जशी शिक्षा होई, त्याचप्रमाणे वेठबिगार चुकविणाराला शिक्षा करण्याचा अधिकार सरकारला होता.

हिंदुधर्मशास्त्रांची वेठबिगारीला मान्यता :

प्राचीन काळी हिंदुधर्मशास्त्रकारांनी वेठबिगारीला मान्यता दिली आहे. गौतम, मनु आणि विष्णू या धर्मशास्त्रकारांनी कारागीरवर्ग, आणि शूद्रवर्गाकडून महिन्यांतून एक दिवस विनावेतन सेवा करवून घेण्याचा अधिकार राजाला दिला आहे. शुक्राने तर ही विनावेतन सेवा महिन्यातून दोन दिवस घ्यावी असे म्हटले आहे.[१] कारागिरांना ज्या दिवशी विनावेतन काम करण्यासाठी बोलाविण्यांत येईल त्या दिवशी त्यांना सरकारने मोफत भोजन दिले पाहिजे, असे गौतमाने म्हटले आहे अशा रीतीने धर्मशास्त्रांची मान्यता असलेल्या वेठबिगार या संस्थेत तसे पाहिल्यास अयोग्य असे फारसे काही नव्हते; कारण गरीब वर्गांना त्यांच्या ऐपतीनुसार भरावयाच्य कराऐवजी महिन्यातून एक अथवा दोन दिवस सरकारचे विनावेतन काम करावे लागत होते व त्या दिवशी त्यांना मोफत जेवणही मिळत होते. परंतु मध्ययुगीन कालांत वेठबिगारीच्या प्रमाणाकडे शासनाने लक्ष पुरविलेले नसल्यामुळे वेठबिगार ही गरीब, शूद्रातिशूद्रांना सक्तीने दीर्घकाळ विनावेतन राबवून घेण्याची संस्था बनल्याचे स्पष्ट दिसते. म्हणूनच महाराष्ट्रांत मराठेकालांत वेठबिगार ही संस्था शूद्रातिशूद्रांना अगदी नकोशी झाल्याचे आढळून येते; आणि तिच्या बंधनांतून निसटून जाण्याचा प्रयत्न संबंधित लोक करीत असल्याचे आढळते. त्यावरून महाराष्ट्रांत वेठबिगारीचा बोजा संबंधित वर्गांवर प्रमाणाबाहेर पडत असला पाहिजे हे स्पष्ट होते.

वेठबिगारीचे बंधन कोणावर होते ?

मनूने " यंत्रे दुरुस्त करणारे लोक, कारागीर, अथवा हुन्नर जाणणारे लोक आणि शूद्रलोक, जे अंगमेहेनत करून जगतात " अशांना विनावेतन काम करून घेण्या-

साठी बोलाविण्याचा राजाला अधिकार सांगितला आहे. अशा प्रकारचे काम प्रत्येक महिन्यात एक दिवस घेण्यात यावे असे म्हटले आहे.[३] शिवकालीन कागदपत्रांतून पुढील वर्गांचा उल्लेख वेठबिगारबद्ध लोकांमध्ये करण्यात आल्याचे आढळते :

(१) बकाळ, ठाकुरी, अनाडी.[४]
(२) शेताचे अर्धेले, आनाडी, खलक, वाडवल.[५]
(३) शूद्र बलुतेदार वर्ग – सुतार, गुरव, बुरूड, जिनगर, कुंभार वगैरे.
(४) अतिशूद्र बलुतेदार वर्ग – महार, मांग, चांभार, वगैरे.

अशा वर्गांना वेठे अथवा वेठबिगारी अशा नावांनी संबोधण्यात आले आहे.

वेठबिगारीच्या कामाचे स्वरूप :

वेठबिगारीबद्ध वर्गांकडून ठरलेली विनावेतन सेवा करवून घेण्याचा अधिकार सरकारचे अधिकारी वापरीत असत. सामान्यतः वेठबिगारांना किल्ल्यात चालणारे बांधकाम, दुरुस्ती, अन्नधान्य, दारूगोळा वगैरे किल्ल्यावर चढविणे आणि इतर दैनंदिन अंगमेहनतीची कामे वगैरे कामे करावी लागत. मोहिमा, वेढे, परकीय आक्रमणे चालू असताना सर्वच प्रकारची कामे वेठ्यांकडून घेण्यात येत असत.[६] पेशवेकाळात (१७०८–१८१८ इ. स.) वेठ्यांकडून सरकारी कुरणातील गवत कापणे, गुरांचे गोठे बांधणे आणि मोहिमांतील आवश्यक कामे करून घेण्यात येत असत.

वतनदार, इनामदारांना वेठबिगारीचा हक्क :

शिवकालीन कागदपत्रांतून सरकारच्या अधिकाऱ्यांबरोबर वतनदार, इनामदारांनासुद्धा वेठबिगारीची सेवा संबंधित वर्गांकडून घेण्याचा अधिकार देण्यात आला होता असे दिसते. मोकासेदार, मोकदम अथवा पाटील, देवस्थानाचे अधिपती, पेठांचे अधिकारी, इनामदार, इत्यादी वतनदारांना वेठबिगारबद्ध वर्गांकडून विनावेतन सेवा घेण्याचा हक्क देण्यात आला होता.[७] वेठबिगारबद्ध धंदा म्हणून ज्या वस्तू बनवीत त्या वेठबिगारीचा मोबदला म्हणून वतनदारांना देत असत. उदा. देसाई अथवा देशमुखांना "दर गावास १० चिवटे, वाख १० पेंडे, दोन बकरी, तूप घागर एक, धनगराचे मागास घोंगडी एक, कडबा दर शेतास लाप एक हजारी, कोष्टी मागास रुपये निमेप्रमाणे वगैरे."[८] वतनदार पाटलाला हक्क म्हणून पुढील वस्तू मिळविता येत : "तांबोळ्याच्या जातीस दररोज पाने १००, तेल्याच्या घाण्यास तेल दररोज वजन ८८९, चांभाराच्या जातीस सालीना जोडा १, वाजंत्री दसरा–दिवाळीस (मांगाकडून), साळ्याच्या जातीस सालीना सरुद १, धनगराच्या जातीस सालीना चवाळे, कोष्ट्याच्या जातीस पासोडी, शिंप्यांच्या जातीस दिवाळीस चोळखण सालीना ५, बकरी कसाई याच्याकडून मांस वजन पावशेर" वगैरे हक्क वसूल करण्यात येत असत.[९] इतर वतनदारही त्यांचे हक्क वस्तूंच्या रूपाने वसूल करीत होते.

नुसती सेवा करणाऱ्या वेठ्यांकडून (उदा. महार) वतनदार सरपण आणणे, लाकडे फोडणे, वगैरे कामे करून घेत.

किल्लेदारांनासुद्धा वेठबिगारीचा हक्क वसूल करता येत होता. राबते महारांना किल्ल्याच्या कोटाचे संरक्षण करण्यासाठी वर्षातून एक महिना सरकारांत खपावे लागे, राबते गुरवांना दर आठवड्यास पानांचा एक भारा पत्रावळीकरिता किल्लेदाराला आणून द्यावा लागे.[१०]

वेठ्यांना मिळणारी पोटासाठी अडशेरी :

मराठेकालांत वेठबिगारी करणाऱ्या लोकांना त्यांच्या पोटासाठी म्हणून अडशेरी देण्यात येई. अडशेरी बहुधा धान्याच्या रूपाने देण्यात येत असली पाहिजे. कधी कधी वेठ्यांना कामावर असताना शिजविलेले अन्न देण्यात येई. पेशवेकालात वेठ्यांना काही प्रसंगी उपजीविकेसाठी नाममात्र पैशाच्या रूपाने अडशेरी देण्यात येत होती. ठरलेली अडशेरी जर मिळाली नाही तर त्याविरुद्ध तक्रार करण्याची सोय नव्हती. फार तर वेठबिगारी त्रस्त होऊन गाव सोडून पळून जात; परंतु तसे केल्याने ते सरकारच्या शिक्षेस पात्र होत.

शिवकालातील वेठबिगार :

शिवकालांतील वेठबिगारीबद्दल अधिक माहिती कोकणांतील चौल शहरातील अधिकारी घराण्याच्या दफ्तरातच सापडते; त्यामुळे याच दफ्तरातील कागदपत्रांचा उपयोग या लेखांत करण्यात आलेला आहे. इतर भागांतील वेठबिगारीसंबंधीचे शिवकालांतील कागद फार कमी उपलब्ध होतात. त्यामुळे कोकणांत चौलच्या प्रदेशात वेठबिगारीसंबंधाने जी स्थिती आढळते, तशीच स्थिती, थोडाबहुत फरक वगळता, शिवाजीराजाच्या इतर प्रदेशातही असावी असे गृहीत धरण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

प्राचीन काळापासून चालत आलेली वेठबिगारीची पद्धत मध्ययुगीन महाराष्ट्रात चांगलीच स्थिरावलेली दिसते. शिवकालापूर्वीच्या मुस्लिम राजांच्या काळांतही ही संस्था चालत असलेली दिसते.

मुसलमानी अंमल :

मुसलमानी अंमलात १२ जानेवारी, १५८९ इ. स. सालच्या चौलच्या एका सरकारी अधिकाऱ्याच्या आदेशांत पुढील उल्लेख आढळतो : " ....वेठीबिगारीकरिता आगराची (चेऊलची) नाकिर्दी जाली आहे. तरी वेठीबिगारीची तसवीस माफ करणे व आगरीहून भाजीपाला व केलें (केळी) आंबे, बाजारामध्ये विकावया नेतो त्यासी वानगी म्हणौनु [नमुन्यादाखल वसुली] हर कोण्ही तसवीस देऊनु लुटिताती ...." अशी तक्रार करण्यांत आली होती. त्यावर आज्ञा देताना

अधिकाऱ्याने आपल्या पत्रांत म्हटले आहे. " ....तरी आगर मजकुरीचे (चेऊलचे) प्रजांसी वेठीबिगारीची तसवीस ने दीजे व सबजी व केले व आंबे विकितील त्यासी वानगी ने धीजे, तसवीस न दीजे." [११] वेठीमध्ये मळयांत पिकणाऱ्या मालावरील वेठीला " पाणवेठी " म्हणत. त्यानुसार बाजारांत येणाऱ्या केळी, आंबे, भाजीपाला यावर वानगीदाखल वेठी घेण्यात येत असे.[१२] तो प्रकार बंद पाडण्यासाठी वर उल्लेखिलेली आज्ञा काढण्यात आली होती.

मलिक अंबरच्या काळातील भरभराटीचे कारण

निजामशाही राजवटीत मुख्य प्रधान मलिक अंबरने त्या राज्यात अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या होत्या; त्यामुळे राज्यात, विशेषत: चौल प्रदेशात भरभराट झाली होती असे एका कौलनाम्यावरून दिसते. त्याचे कारण म्हणजे मलिक अंबरने बेकायदेशीर आणि जुलमी करवसुली बंद केली आणि लोकांवर होणारा अन्याय थांबविला. इ. स. १६४५-४६ सालच्या चेऊलच्या एका कौल-नाम्यात म्हटले आहे. " ....कदीम कारकीर्द निजामशाह दरजमाने मलिक अंबर अजाजीत पटिया व मिरासदारी पटिया व सादिलवार पटिया व गैरमहसूल व निपुत्रिक व जुळूम ज्याजती व वेठबिगारी व जाबती फर्मासी येकजरा सदरहू तसविजा लागलीया नाही या करिता मामले (मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल) मजकूरीची मामुरी जाली होती येण्हेकरिता मलिक अंबरचा ऐसाफ (इन्साफ-न्यायप्रियता) चौपातशाहीमध्ये जाला...."[१३] यावरून निजामशाही राजवटीत मलिक अंबरने बऱ्याच बेकायदेशीर आणि जुलमी करांबरोबर वेठबिगारही बंद केली होती, आणि त्याबद्दल समकालीन दख्खनच्या चार पातशाह्यांमध्ये त्याच्या न्यायप्रियतेचा लौकिक पसरला होता, आणि मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊलची जोरदार भरभराट झाली होती, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

चौलवर शिवाजीमहाराजांचा अंमल :

चौलचा प्रदेश इ. स. १६७० नंतर शिवाजीमहाराजांच्या अंमलाखाली आला.[१४] तेव्हापासून मात्र चौलमधील वेठबिगारीसंबंधीची स्थिती बदलल्याचे पुढील पत्रांतील उल्लेखावरून दिसते. इ. स. १६८०-८१ सालच्या एका पत्रांत म्हटले आहे : " ....मामले मजकूरी (मुर्तजाबाद ऊर्फ चेऊल) किलेयाची वेठबिगार हमेश्या पडते तेणेकरून कुणबी खलकाचा राहराबट होत नाही. कितेक गाव वैराण पडतात म्हणून मीर सैद महमद दिवाण (शिवाजीराजांच्या ताब्यात चेऊल येण्यापूर्वीचा मुसलमान अधिकारी) येही किलेयाची वेठबिगार कुल माफ केली आहे. हली साहेबाची [शिवाजीमहाराजांची] काबिजात आलियावरी वेठबिगार घेऊनु किलेयास नेतात. येणेकरून कीर्दीचा हंगाम अंतरतो...."[१५] यावरून मलिक अंबर आणि मुसलमान अधिकाऱ्यांनी बंद केलेली वेठबिगार पद्धत शिवाजीराजाच्या

राजवटीखाली पुन्हा सुरू करण्यात आली होती हे स्पष्ट होते. आपल्या राजवटीत मलिक अंबरच्या काळातील जमीन महसुलाच्या रयतोपयोगी सुधारणा चालू ठेवणाऱ्या शिवाजीराजाने मलिक अंबरच्या काळात बंद केलेली वेठबिगार पद्धत का सुरू केली हे कळण्यास मार्ग नाही. बहुधा मराठी स्वराज्य-राजवटीत अनेक नवे किल्ले बांधणे, जुन्यांची दुरुस्ती करण्याचे प्रचंड काम करून घेण्यासाठी मलिक अंबरने बंद केलेली वेठबिगार पुन्हा सुरू करण्यात आली असावी, असे वाटते. या मुद्यावर अधिक संशोधनाची जरुरी आहे.

वेठबिगारीविरुद्ध रयतेच्या तक्रारी :

प्राचीन काळी कराऐवजी सरकारला सेवा पुरविणे हे कितीही समर्थनीय असले तरी शिवपूर्वकाल आणि शिवकालात वेठबिगारीमुळे संबंधित वर्गांवर विनावेतनश्रमाचा फार बोजा पडत होता असे दिसते. वेठबिगारीमुळे संबंधित लोक फार हैराण होऊन गावे सोडून पळून जात असलेले दिसतात. इ. स. १६८०-८१ सालच्या चौलच्या एका पत्रातील माहितीवरून शिवपूर्व मुसलमानी काळात वेठबिगारांना किल्ल्यांवर खूप कष्टांची कामे करावी लागत असल्याने संबंधित जातींचे लोक गावे सोडून पळून जात आणि त्यामुळे गावेच्या गावे वैराण पडत होती असे दिसते.[१६] शिवकालातही, वेठबिगारीमुळे लावणीपेरणीचा हंगाम अंतरतो; वेठबिगारीच्या त्रासामुळे कितीतरी कुणबी, खलक लोक पळून जातात, अशा तक्रारी अधिकारी लोक सरकारकडे करीत असल्याचे आणि वेठबिगार पद्धत बंद करा अशी विनंती करीत असल्याचे कागदपत्रातून आढळते.[१७] परंतु सरकारने मात्र वेठबिगार बंद केली नाही. "हाली मसलतेचा (मोहिमांचा) वख्त आहे धामधुमीमुळे वेठ पडते. पेस्तर (पुढे) वेठीची तसवीस न लगे" असे सरकारतर्फे संबंधितांना कळविण्यात आले.[१८] यावरून शिवकालात किल्ल्यावरील वेठबिगारीमुळे संबंधित वर्ग खूप हैराण, त्रस्त झालेले होते याची कल्पना येते. तथापि, वेठबिगार बंद करण्याच्या विनंतीचा स्वीकार सरकार करू शकत नव्हते, कारण तो काळ धामधुमीचा, मोहिमांचा, शत्रूंच्या स्वाऱ्यांचा असल्याने वेठबिगारीचे काम खूप पडत होते. पुढील वर्षी अशा प्रकारचा वेठबिगारीचा त्रास होणार नाही, असे आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले होते. यावरून वेठ्यांच्या तक्रारींचा सरकार सहानुभूतीने विचार करीत होते, असे दिसते.

संभाजी महाराजांची कारकीर्द :

संभाजी महाराजांच्या कालातही वेठबिगारीची पद्धत चालूच राहिली. ६ एप्रिल, १६८५ सालच्या चौल अधिकाऱ्याच्या एका कौलनाम्यात म्हटले आहे, "...कुली सेताचे आरधेले व आनाडी, खलक वेठबिगारीस हमेशा त्यांचे पाठीशी लागली तेणें करून राबरूब बांदबदिस्त राहिली याकरिता कीर्दी राहिली."[१९] त्याच कौलनाम्यात पुढें म्हटले आहे, "....जिरायती व बागाईतीचें वाडवल व आनाडी

यांचे पाठीशी हमेशा वेठबेगारी लागली आहे ते दुरी केली पाहिजे. वेठीकरिता सेताचा राबकस्ट राहाताती व वाडीचे कुंपकुडण व झाडांस सेणपाणी होत नाही, खराब पडते तरी वेठबेगारीची तसवीस दूर केली पाहिजे....".[२०] वरील प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर सरकारतर्फे देण्यात आलेले उत्तर असे होते : "साल मजकुरी भांडे (तोफा) राजकोटास् ठिकाणी पाविलियावरी आणीक वेठीची तसवीस लागणार नाही."[२१]

३० ऑक्टोबर, १६८७ इ. स. च्या एका कौलनाम्यांत वेठबिगारांनी सरकारकडे केलेल्या तक्रारीचा उल्लेख आढळतो तो पुढीलप्रमाणे "वेठबेगार रायेगड व खांदेरी, कुलाबा, सागरगड, पद्मदुर्ग हे आमच्याने करवत नाही. जे काम सांगणे ते शाहारात कबूल असो."[२२] यावरून किल्ल्यांतील वेठबिगारीच्या कष्टाच्या कामामुळे संबंधित लोक किती हैराण, त्रस्त झालेले होते व तसे काम आमच्याने करवत नाही असे स्पष्टपणे सरकारला केवळ नाइलाज म्हणूनच सांगण्याचे धैर्य त्यांच्यात आले होते हे स्पष्ट आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी वेठ्यांची वाजवी तक्रार विचारात घेऊन "शाहाराखेरीज दुसरे जागा तुम्हां कोन्हास पाठवनार नाही. समजाद असो देणें,"[२३] असे उत्तर दिले. यावरून वेठ्यांची तक्रार सरकारने मान्य करून त्यांना शहरातच वेठीचे काम देण्याचे स्वीकारण्यात आले. शहरातून वेठ्यांना कोणते काम देण्यात आले होते, हे पुराव्याअभावी सांगणे कठीण आहे. एकंदरीत, शिवकालात किल्ल्यांतील वेठबिगारीचे काम अत्यंत कष्टाचे होते हे स्पष्ट होते, आणि त्याविरुद्ध करण्यात आलेल्या वाजवी तक्रारी सरकारने स्वीकारून वेठ्यांना शहरातून काम देण्याचे मान्य केले होते.

वेठबिगारीपासून सूट :

वेठबिगारीच्या कामातील कष्टमय स्थिती लक्षात घेऊन सरकार कधीकधी संबंधित लोकांना वेठबिगारीच्या कामातून तात्पुरती सूट देत असे. ३० ऑक्टोबर, १६८७ च्या चौल अधिकाऱ्याच्या एका कौलनाम्यातील पुढील उल्लेख पहा : "आनाडी कुले असेल त्यास एकसाल घरटका व मीठ माफ करणे व बेगारीची तसवीस न लगे ते दूर केली पाहिजे", अशी कौलनाम्यातील वेठ्यांची विनंती आहे. यावर सरकारतर्फे पुढील उत्तर देण्यात आले : "....मीठटका घेऊन घरटका व वेठबेगार याची तसवीस लागो देणार नाही, येकसाला माफ असे."[२४] अशा रीतीने सरकार कधीकधी संबंधितांना वेठबिगारीपासून तात्पुरती सूट देत असे. एखाद्या वर्गाला वेठबिगारीपासून कायमची सुटका दिल्याची उदाहरणे आढळत नाहीत.

निष्कर्ष :

वरील विवेचनावरून हे अगदी स्पष्ट होते की, पूर्वपरंपरेचा वारसा म्हणून

मुसलमानी काल आणि शिवकालात वेठबिगार ही संस्था महाराष्ट्रात चालत आली होती. तथापि चौलच्या अधिकारी घराण्याच्या कागदपत्रांवरून, कोंकणात वेठबिगार संस्थेचे स्वरूप समजत असले तरी, शिवराज्यातील इतर प्रदेशात तिचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट होत नाही. त्याचे कारण म्हणजे समकालीन कागदपत्रांचा अभाव. तथापि, कोंकणात आणि इतर प्रदेशात खेड्याचे, परगण्याचे, पेठेचे अधिकारी, वतनदार, इनामदार, पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे या सर्वांना संबंधित वर्गांकडून वेठबिगार घेण्याचा वंशपरंपरेने अधिकार प्राप्त झाला होता, व त्याची अंमलबजावणीही होत होती.

मुसलमानी काल आणि शिवकालात वेठबिगारीच्या कामाचा उपयोग किल्ल्यात करण्यात येत होता, हे चौलच्या अधिकारी घराण्याच्या कागदपत्रांवरून स्पष्ट झाले आहे. किल्ल्यांतील कामे म्हणजे बहुधा बांधकाम, दुरुस्ती, तटांचे संरक्षण, रात्रीची रखवाली, किल्ल्यांवर धान्य चढवणे, वजनदार तोफा चढवणे, आणि इतर विविध प्रकारची अंगमेहनतीची कामे यांचा समावेश होत असावा. किल्ल्यांवरील कामे फार कष्टाची असल्याने त्यांविरुद्ध तक्रारी आल्यास काही प्रसंगी काही लोकांना शहरातून वेठबिगारीचे काम देण्यात येत असे. काही वेळेस वेठबिगारीपासून एखाद्या वर्षी काही वर्गांना विनंतीवरून तात्पुरती सूटही देण्यात येत असे. तथापि, शिवकालात वेठबिगारीची कामे दीर्घ मुदतीची आणि फार कष्टाची होती याबद्दल संशय राहात नाही. पण पुराव्याअभावी वेठबिगारीची शिवकालातील मुदत स्पष्ट करणे कठीण आहे.

शेतीच्या कामात व्यत्यय :

वेठबिगारीच्या कामामुळे महाराष्ट्रात शेतीच्या मशागतीच्या कामात खूप अडथळे आल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट दिसते. त्यामुळे शेतीच्या उत्पादनावरही परिणाम झाला असला पाहिजे. कुणबी, खलक वेठबिगारीच्या त्रासामुळे गाव सोडून पळून गेल्यामुळे कित्येक गावे वैराण पडतात, पेरणी, मशागतीची कामे वेळेवर होत नाहीत, वाडीतील घरांची शाकारणी, दुरुस्ती, डागडुजीची कामे पडून राहतात, झाडांना खतपाणी पुरविणे होत नाही वगैरे तक्रारी कागदपत्रांतून करण्यात आल्या आहेत. त्यावरून मुसलमानी काल आणि शिवकालात शेतीच्या कामात वेठबिगारीमुळे बराच अडथळा येत होता, हे सिद्ध होत आहे. वेठबिगारीच्या त्रासदायक कामांमुळे संबंधित लोक गाव सोडून पळून जात असल्याने त्यावेळचे ग्रामीण जीवन बऱ्याच प्रमाणात विस्कळीत होत असले पाहिजे, आणि त्याचे परिणाम समाजजीवनावर झाले असतील, हे स्पष्ट आहे.

सामाजिक परिणाम :

वेठबिगार संस्थेचे सामाजिक परिणाम काय झाले असावेत याचा विचार

करताना औरंगजेबकालीन हिंदूंवर लादलेल्या जझिया कराची आठवण होते. जझिया कर जसा हिंदूंवरच ते हिंदूधर्मीय असल्यामुळेच लादण्यात आला होता आणि त्यातून धर्मांतर केल्याशिवाय सुटका नव्हती, त्याचप्रमाणे शूद्रातिशूद्र वर्गांना मुसलमानी आणि शिवकालात केवळ ते त्या वर्गांचे आहेत म्हणूनच वेठबिगारीची अतिशय कष्टाची कामे करावी लागत होती. आणि त्यांतून त्यांची सुटका कधीच शक्य नव्हती. अशा रीतीने वेठ्यांना सामाजिक अपमान आणि आर्थिक शोषणाला बळी पडावे लागत होते, हे स्पष्ट आहे. अतिशूद्रांतील महार, मांग, चांभार या जातींच्या लोकांना बलुतेदारी पद्धतीत आणि गावकीच्या वतनदारीत अगोदरच अतिशय निकृष्ट, दरिद्री आणि लाचारीचे जीवन जगावे लागत होते. तशात, वेठबिगारीमुळे त्यांच्यावर शक्तीचे विनावेतन श्रम लादण्यात आल्याने त्या जातींची अत्यंत पिळवणूक झाली आणि त्यांना सामाजिकदृष्ट्या अत्यंत हीन असे स्थान प्राप्त झाले हे स्पष्ट होते.

शिवकालात स्वराज्यस्थापनेच्या चळवळीत समाजातील सर्वच वर्गांनी अनेक महत्त्वपूर्ण कामे केली आहेत. त्या काळात ३०० ते ४०० पर्यंत किल्ले शिवाजीराजाने नवे बांधले, अथवा जुने दुरुस्त केले. ही अवघड आणि कष्टाची कामे करण्यात वेठबिगारबद्ध शूद्रातिशूद्र जातींनी फार मोठ्या प्रमाणावर मराठी स्वराज्य-उभारणीला हातभार लावलेला आहे. दुर्दैवाने, वेठबिगारबद्ध वर्गांनी केलेल्या या खऱ्याखुऱ्या त्यागाची आणि कष्टांची दखल कोणत्याही इतिहासकाराने अजून घेतलेली नाही; त्यांच्या कार्याचा शब्दानेही कधी कोणी गौरव केला नाही, हा त्यांच्यावरील मोठा सामाजिक अन्याय आहे. मराठ्यांच्या स्वराज्य-उभारणीच्या कार्यात वेठ-बिगारांनी केलेल्या विनावेतन श्रमांबद्दल ऋणनिर्देश केल्याशिवाय आणि उशिरा का होईना, त्याबद्दल त्यांचा गौरव केल्याशिवाय महाराष्ट्राचा सामाजिक आणि आर्थिक इतिहास पूर्ण होऊ शकणार नाही.

■ ■

Veth Bigar, or, Forced Labour in the Seventeenth Century Maharashtra

Summary

In ancient times **Vishti** was a tax in terms of physical labour imposed by the State on poor artisans and low caste people. Since it was a tax, it was realised under conditions of compulsion. 'Veth Bigar' or forced labour was its medieval version in Maharashtra. Along with the State, the

vatandars and **inamdars** had also certain privileges by which they got the stipulated works done by the Veth Bigars under their jurisdiction. Many times complaints were made against the inconveniences caused to the villagers because of this system, as it came in the way of their agricultural operations. The State mostly used the Veth Bigars for such works as building of forts, hoisting of cannons, grain bags etc. Certain concessions were also given in Veth Bigar work.

Veth Bigars have played an important role in the independence movement launched by Shivaji, by contributing their unremunerated physical labour in the construction and repairs of hundreds of forts and similar other works.

संदर्भ

१. गौतमधर्मसूत्रे – २–१–३१; मनुस्मृति – ७–१३८; विष्णू – ३–३२.
२. गौतमधर्मसूत्रे – २–१–३५.
३. मनुस्मृति – ७–१३८.
४. शिवचरित्र-साहित्य, खंड ९ वा, पृ. ५०.
५. कित्ता, खं. ९, पृ. ६४–६५.
६. कित्ता, खं. ९, पृ. ६५, ७७–७८.
खं. १०, पृ. २२.
७. कित्ता, खं. २, लेखांक १२८, ३८, ५२, २१३, ३७४
खं. ३, लेखांक ३९८, ५३०, ३३, ३६, ४९, ५५, ६६३, ६६.
खं. ७ वा, लेखांक ६, ४९, ५५, ६५.
खं. ९ वा, लेखांक ११, ४६, ६३, ६९, ७१.
खं. १० वा, लेखांक १४.
८. भावे, वा. कृ., शिवराज्य व शिवकाल, पृ. २३९.
९. कित्ता, पृ. २४२.
१०. कित्ता, पृ. २०४
११. शिवचरित्र-साहित्य, खं. ९, लेखांक १२.
१२. कित्ता, खं. ९, ले. ११, १२.
१३. कित्ता, खं. ९, ले. ४३.

१४. कित्ता, खं. ९, ले. ५३.
१५. कित्ता, खं. १०, ले. १४.
१६. कित्ता, खं. १०, ले. १४.
१७. कित्ता, खं. १०, ले. १४.
१८. कित्ता, खं. १०, ले. १४.
१९. कित्ता, खं. ९, ले. ६३.
२०. कित्ता, खं. ९, ले. ६३.
२१. कित्ता, खं. ९, ले. ६३.
२२. कित्ता, खं. ९, ले. ७१.
२३. कित्ता, खं. ९, ले. ७१.
२४. कित्ता, खं. ९, ले. ६९.

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : २, ऑक्टोबर १९८४

उत्तर पेशवाईतील सिद्दी बाळू मिया प्रकरण (इ. १७८४–१८०२)

मा. रा. कंटक

डेक्कन कॉलेज, पुणे

'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' ही कव्युक्ती एखाद्या ऐतिहासिक घटनेलाही लागू पडताना कधी कधी दिसून येते. उत्तर पेशवाईतील, इ. १७८४ ते १८०२ या काळातील सिद्दी बाळू मिया प्रकरण ही अशीच एक घटना होय. हे प्रकरण जरी क्षुल्लक भासत असले, तरी त्यामागील राजकीय आशय मोठा आहे. केवळ त्याच्या वरवरच्या स्वरूपाकडे पाहून असेल कदाचित, इतिहास संशोधकांनी त्याची हवी तेवढी दखल घेतलेली नाही. रियासतकार सरदेसाई यानी या प्रकरणाचा उल्लेखही आपल्या लिखाणात केलेला नाही. पण ग्रँट डफ,[१] बाळाजी केशव भोसले[२] व डी. आर. बनाजी[३] यानी या प्रकरणाची हकीगत, थोडक्यात का होईना, आपापल्या ग्रंथांत दिलेली आहे. काही वर्षांपूर्वी श्री. ग. रा. वाळिंबे ऊर्फ रामतनय या गृहस्थांनी 'पराग' मासिकात बाळू मियासंबंधी दोन त्रोटक लेख लिहिले होते.[४] अलीकडे डॉ. रवींद्र रामदास यांनी मराठे-सिद्दी संबंधांवरील आपल्या अप्रकाशित प्रबंधात, या प्रकरणाविषयी वरील लेखकांनी दिलेल्या माहितीपेक्षा थोडी अधिक माहिती दिलेली आहे.[५] तरीसुद्धा बाळू मियासंबंधीच्या आजवरच्या लिखाणातील तपशील अपुरा आहे. तसेच या प्रकरणाचे उत्तर पेशवाईतील हिंदुस्थानच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्व काय याचे विवेचन कोणीही केलेले नाही. प्रस्तुत लेखात हे विवेचन आलेले असून, ते करताना या प्रकरणासंबंधी पूर्वी माहीत नसलेले काही महत्त्वाचे तपशील उजेडात आणलेले आहेत.

पुण्याच्या डेक्कन कॉलेज संग्रहात नाना फडणिसाचे मेणवली दफ्तर आहे. त्यातील रुमाल क्र. ७९ मध्ये असलेली मराठी (मोडी) कागदपत्र, पुणे पुराभिलेखागारातील (जुन्या पेशवे-दफ्तरातील) घडणी रुमाल क्र. २७२ मधील मराठी (मोडी) कागदपत्रे आणि मुंबई पुराभिलेखागारातील (Bombay Archives) सीक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायऱ्यांतील ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबई सरकारचा इंग्रजी पत्रव्यवहार, यांवर प्रस्तुत लेख प्रामुख्याने आधारलेला आहे. हा

सर्व मराठी व इंग्रजी पत्रव्यवहार अप्रकाशित असून, त्याचा एकूण काळ इ. १७८४ ते १८०२ असा आहे.

मेणवली दफ्तरातील पत्रे ही कोकण सुभ्यातील जंजिरा-मुरूडच्या आसपासच्या मराठ्यांच्या प्रदेशातील नाना फडणिसाचे मुलकी अधिकारी भिकाजी गोविंद ठोसर, गोविंदराव व चिमणाजी माणकर आणि जयराम त्र्यंबक बापट यांनी नानाला व सवाई माधवराव पेशवे यांना उद्देशून लिहिली आहेत. पुणे पुराभिलेखागारातील मोडी पत्रे, इ. स. १७८५ ते १७९१ या काळात मराठे व जंजिरेकर यांच्यात झालेल्या तह-करारांविषयीची आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या इंग्रजी पत्रव्यवहारात बाळू मिया प्रकरणातील इंग्रजांचे धोरण व त्यास अनुसरून त्यांनी लढविलेले राजकीय डावपेच उत्तम प्रकारे प्रतिबिंबित झाले आहेत. तसेच इ. स. १७९१ नंतरच्या बाळू मियाच्या हालचालींची माहिती ही फक्त इंग्रजी पत्रव्यवहारातच उपलब्ध आहे.

सिद्दी बाळू मिया प्रकरणास सुरुवात झाली ती इ. १७८४ मध्ये. या वर्षाच्या सुरुवातीस जंजिऱ्याचा मुख्य सिद्दी याकूत मरण पावला आणि सिद्दी अब्दुल रहीम हा तेथील गादीवर बसला. त्याच्या कारकिर्दीत त्याच्याखेरीज आणखी दोन व्यक्ती जंजिऱ्याच्या राजकारणात प्रमुख होत्या. त्या म्हणजे, जंजिरा किल्ल्याचा किल्लेदार व सिद्दी रहीम याचा जावई सिद्दी जोहर, आणि गेली बारा वर्षे मदगडच्या डोंगरी किल्ल्याचा किल्लेदार असलेला सिद्दी जमरूद,[६] या होत.

अब्दुल रहीम गादीवर आला तेव्हापासून त्याच्यात व पुणे दरबारात कुरबुरीला सुरुवात झाली. पहिल्या बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दीत, इ. १७३६ मध्ये मराठे-सिद्दी तहाने पुढील गोष्टी ठरल्या होत्या : त्या वेळच्या जंजिरेकरांच्या अकरा महालांपैकी तळे, घोसाळे, बीरवाडी, निजामपूर, गोरेगाव व गोवळ महालाचा अर्धा भाग हे साडेपाच महाल मराठ्यांच्या ताब्यात रहावेत; उरलेले नांदगाव, मुरूड, श्रीवर्धन, दिवा, म्हसले आणि गोवळ महालाचा राहिलेला अर्धा भाग हे सिद्दीकडे रहावेत; या अकरा महालांतील वसूल दोघांनी मिळून वाटून घ्यावा; त्यासाठी परस्परांचे कारकून व मुलकी अधिकारी परस्परांच्या महालांत ठेवावेत.

सुरुवातीस ही व्यवस्था सुरळीत चालली, पण काही काळाने बंद पडली. या बाबतीत सिद्दी रहीमची एक तक्रार होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, मराठ्यांचे कारकून व अधिकारी त्यांच्या प्रदेशातील वसूल तर घेतच, शिवाय जंजिरेकरांच्या महालांतीलही वसूल लाटत. त्यांच्या या चलाखीमुळे, पुणे दरबारकडून ८०,००० रुपये आपल्याला येणे आहेत, असा त्याचा दावा होता.[७] या मुख्य मुद्द्याखेरीज वादाचे आणखी काही मुद्दे सिद्दी–मराठे यांत होते. मराठ्यांचे देशमुखी हक्क पूर्वीपासून जंजिरेकरांच्या महालांत होते. ते इ. १७६१ मधील रामाजी महादेव बिवलकर याच्या जंजिऱ्यावरील हल्ल्यानंतर त्या वेळच्या सिद्दीने रद्द केले होते. पुणे दरबारला

ते हक्क पुन्हा चालू करून हवे होते. परस्परांच्या ताब्यातील परस्परांचे कैदी व मालमत्ता यांचाही प्रश्न सुटावयाचा होता. तसेच इ. १७८४ मध्ये मराठ्यांनी मदगड भेदनीतीनें घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, तेव्हापासून नानाचा अधिकारी गोविंदराव माणकर याचे सैनिक त्या किल्ल्याच्या पेठेत ठाण मांडून बसले होते; ते पुणे दरबारने काढून घ्यावेत असा सिद्दी रहीमचा आग्रह होता.

हा सर्व प्रकार चालला असताना मुख्य सिद्दी रहीम याचे जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर व मदगडचा किल्लेदार सिद्दी जमरूद ह्या दोघांशी वाकडे आले. जोहर हा अब्दुल रहीमशी फटकून वागू लागला आणि जमरूदला तसेच करण्याबद्दल उत्तेजन देऊ लागला. त्याच्याच फुशीमुळे जमरूद हा सिद्दी रहीमला न विचारता तळ्याला नानाचा अधिकारी भिकाजीपंत ठोसर याच्याकडे गेला. तळ्याला त्याचे वास्तव्य असतानाच सिद्दी अब्दुल रहीम २९ नोव्हेंबर १७८४ रोजी आजाराने मृत्यु पावला.[८]

सिद्दी रहीमच्या मागे जंजिऱ्याच्या गादीबद्दल भांडण सुरू झाले. रहीमला दोन मुलगे होते. थोरला अब्दुल करीम ऊर्फ बाळू मिया व धाकटा अब्दुल रहमान ऊर्फ छोटा मिया. धाकट्याचे वय या वेळी सुमारे दहा वर्षांचे होते. अब्दुल रहीमनंतर जंजिऱ्याच्या गादीवर बसण्याचा हक्क वास्तविक होता थोरल्या बाळू मियाचा. रहीमने मृत्युपत्र तयार केले होते; त्यात त्याने, आपला धाकटा मुलगा छोटा मिया याला जंजिऱ्याच्या गादीवर बसवावे व तो वयात येईपर्यंत आपला जावई सिद्दी जोहर याने त्याच्या वतीने सर्व कारभार पहावा, असे लिहून ठेवले होते.[९]

सिद्दी जोहर याच्या ताब्यात जंजिऱ्याचा मुख्य किल्ला व बेट होते. याउलट बाळू मियाच्या हातात त्याचा धाकटा भाऊ तसेच शिक्का, निशाण इत्यादी राजचिन्हे होती. सिद्दी जोहर बाळू मियाला जंजिरा किल्ल्यात घ्यायला तयार नव्हता. परंतु रहीमच्या मृत्युपत्रानुसार छोटा मिया याचा जंजिऱ्याच्या गादीवरील हक्क त्याला मान्य होता. छोटा मिया याला किल्ल्यात घ्यायची त्याची तयारी होती. म्हणजे बाळू मियाला डावलून सर्व जंजिरा प्रदेशाची सत्ता कारभारी (Regent) या नात्याने आपल्या मुठीत ठेवावयाचा त्याचा डाव होता. साहजिकच बाळू मियाचा याला विरोध होता. आपल्याला संरक्षणाखाली जंजिरा किल्ल्यात प्रवेश मिळावा, तसेच जंजिऱ्याच्या कारभारात आपल्याला मुख्य वाटा मिळावा, ही त्याची मागणी होती. यातूनच जोहर–बाळू मिया संघर्षाची ठिणगी पडली.[१०]

या संघर्षात जोहरची सरशी झाली. जंजिरा किल्ला व बेट त्याच्या ताब्यात असल्याने, जंजिऱ्याची सत्ता त्याने हातात घेतली. मग मराठ्यांबरोबरचे आपले वादग्रस्त प्रश्न सोडवून त्यांच्याबरोबर सलोखा निर्माण करण्यासाठी वाटघाटी करण्याच्या दृष्टीने, त्याने तळे येथे जाऊन राहिलेल्या सिद्दी जमरूदला पुण्याला जावयास सांगितले. जमरूद हा जोहरच्या बाजूचा व बाळू मियाच्या विरुद्ध होता. म्हणून जोहरच्या

आदेशाप्रमाणे तो पुण्याला गेला. तेथे पुणे दरबारशी तडजोडीची बोलणी करून त्यान मराठे-जंजिरेकर यांच्यातील वादग्रस्त प्रश्न सोडविण्यासाठी कराराचा एक मसुदा तयार केला. त्यानुसार पुणे दरबारने जंजिरेकरांचे ८०,००० रुपये देणे द्यावयाचे कबूल केले.

हा मसुदा तयार होत असतानाच, सिद्दी जोहरला धडा शिकविण्यासाठी बाळू मियाने आपला वकील शेख अली काझी याला पुण्याला पाठविले. जोहरला ८०,००० रुपये मुळीच देऊ नयेत; उलट मीच तुम्हाला जंजिऱ्याच्या उत्पन्नातील काही भाग व मुलखातील काही गावे देतो, असे या काझीमार्फत बाळू मियाने पुणे दरबारला कळविले. काझी हे काम करून राजपुरीला परतला. सिद्दी जमरूद मात्र पुण्यालाच राहिला.[११] बाळू मियाच्या अटी अधिक फायदेशीर असल्याने, त्याच्याशी करार करून सिद्दी जोहरचे वैर ओढवून घ्यावे की जमरूदशी ठरलेल्या अटींवर करार करून जोहरची मैत्री साधावी, असा पेच नानाला पडला.[१२]

नुसता वकील पुण्याला पाठवून बाळू मिया थांबला नाही. जोहरच्या ताब्यातील जंजिरा किल्ल्यात धान्य, रसद इत्यादी जाऊ देण्यास त्याने प्रतिबंध केला. तेव्हा, बाळू मियाने सुचविलेल्या अटींपेक्षा अधिक चांगल्या अटींवर पुणे दरबारशी तह करून जंजिऱ्यास परतण्याचा निरोप जोहरने जमरूदला पुण्याला पाठविला.[१३] त्याप्रमाणे जमरूद याने जोहरतर्फे पुणे दरबारशी डिसेंबर १७८५ च्या सुमारास एक करार घडवून आणला.

सिद्दी जमरूदने घडवून आणलेल्या करारात पुढील कलमे होती : पुणे दरबार आणि जंजिरेकर यांनी परस्परांच्या महालात कमावीसदार व ठाणी नेमावीत; पुणे दरबारकडून जंजिरेकरांना येणे असलेला इ. १७८५ पर्यंतचा ऐवज जोहरने माफ करावा; इ. १७८६ पासून पुढील हिशोब करून परस्परांचे कमावीसदार जे ठरवतील त्याप्रमाणे एकमेकांनी ऐवज द्यावा घ्यावा; मराठ्यांच्या देशमुखीच्या सनदा जोहरने पुन्हा चालू कराव्यात; मदगडावरील मराठ्यांचे सैनिक काढून घेण्यात यावेत; बाळू मियाचा धाकटा भाऊ छोटा मिया याला जंजिऱ्याच्या गादीवर बसविण्यास पुणे दरबारने मान्यता द्यावी; बाळू मियाने त्याच्या इच्छेनुसार राजपुरीस अगर पुण्यास रहावे; त्याच्या चरितार्थासाठी जोहर व जमरूद यानी त्याला रोख ऐवज तसेच काही गावांची जहागीर द्यावी; सिद्दी जमरूद याने करारातील अटी अंमलात आणून मग पुण्याहून राजपुरीस जावे; छोटा मिया गादीवर बसल्यावर त्याच्या मोहरेनिशी कराराला अखेरचे स्वरूप देण्यात यावे.

करारात ठरल्याप्रमाणे त्याच्या कार्यवाहीसाठी सिद्दी जमरूद पुण्याहून तळयाला भिकाजीपंत ठोसर याजकडे गेला व तेथेच पुढील चौदा महिने राहिला.[१४] या करारानुसार पुणे दरबारने छोटा मिया याचा जंजिऱ्याच्या गादीवरील कायदेशीर हक्क मान्य केला.

जंजिऱ्यात जोहर सर्वसत्ताधीश झाल्याने बाळू मियाला तेथे राहणे धोक्याचे झाले. म्हणून आपल्या काही अधिकाऱ्यांच्या सल्ल्यावरून त्याने बाणकोटच्या (फोर्ट व्हिक्टोरिया) इंग्रजांचा आश्रय घेण्याचे ठरविले. जंजिरेकरांचे सर्वांत चांगले संबंध होते इंग्रजांशी. मुंबईकर इंग्रजांनी वेळोवेळी मराठ्यांविरुद्ध त्यांना मदत करून जंजिरा वाचविला होता. तसेच सिद्दींच्या अंतर्गत कलहांत अनेकवार तटस्थ वृत्तीने मध्यस्थी करून जंजिरेकरांना त्यांनी विनाशाच्या खाईतून बाहेर काढले होते. त्यामुळे बाळू मियाने त्यांच्याकडे प्रथम धाव घेणे स्वाभाविकच होते.

मात्र इंग्रजांची प्रतिक्रिया अजमावण्यासाठी प्रथम स्वतः बाणकोटला न जाता बाळू मियाने आपली व आपल्या काही अधिकाऱ्यांची बायकामुले बाणकोटला पाठविली आणि त्यांना आश्रय देण्याबद्दल तेथील इंग्रज रेसिडेंट विल्यम फार्मर याला विनंतीवजा निरोप पाठविला. इंग्रज-मराठे यांच्या पहिल्या युद्धात जंजिरेकरांनी इंग्रजांच्या बायकामुलांना आपल्या प्रदेशात आश्रय दिला होता. ते ऋण आठवून फार्मरने बाळू मियाच्या बायकामुलांना तात्पुरता आश्रय दिला. पण मुंबई सरकारचे या बाबतीतील धोरण त्याला माहीत नसल्याने, त्या सरकारकडून सूचना आल्यावर नक्की काय ते कळवितो असे त्याने बाळू मियाला उत्तर पाठविले. बाळू मियाचे पत्र फार्मरला २३ नोव्हेंबर १७८५ रोजी मिळाले.[१५] त्यानंतर फार्मरने मुंबई सरकारला लिहिलेल्या पत्राचे उत्तर त्या सरकारकडून त्याला यायला महिना उजाडला.[१६]

दरम्यानच्या काळात बाळू मिया स्वस्थ बसला नाही. त्याने नाना फडणिसाचे कोकणातील मुलकी अधिकारी भिकाजीपंत ठोसर व गोविंदराव माणकर यांच्या-मार्फत पुणे दरबारशी संधान बांधले. तेव्हा, तुमचा धाकटा भाऊ व तुमच्याजवळील राजचिन्हे बरोबर घेऊन तुम्ही पुण्यास यावे, असे नानाने त्याला पत्र पाठविले.[१७] याच वेळी भिकाजीपंत व गोविंदराव या दोघानी मिळून बाळू मियाला वेगळे पत्र पाठविले. त्यात लिहिले होते की सिद्दी जमरूदमार्फत पुणे दरबार व सिद्दी जोहर यांत नुकत्याच झालेल्या करारानुसार, बाळू मियाने धाकट्या भावास जंजिऱ्याच्या गादीवर बसविण्यासाठी जंजिऱ्यास पाठवावे आणि स्वतः राजपुरीस रहावे. यावर बाळू मियाने, दोघानी राजपुरीस यावे, असे त्याना कळविले. पुणे सरकारची राजपुरीस जाण्याची आज्ञा नसल्याचे दोघानी प्रत्युत्तरात बाळू मियाला लिहिले, तसेच त्याने दंडा राजपुरीला किंवा नानाच्या पत्रास अनुसरून पुण्यास जावे, अशी त्यानी आग्रहाची सूचना त्याला केली. बाळू मियाला ती सूचना पसंत नसल्याने त्याने स्वतःची तडजोडीची योजना भिकाजीपंताला कळविली. बाळू मिया व छोटा मिया या दोघानी राजपुरीस रहावे; छोट्या मियाने जंजिऱ्याच्या गादीवर बसावे, आणि दोघानी मिळून जोहर व जमरूद यांच्या सल्ल्याने कारभार करावा,[१८] अशी ती योजना होती.

बाळू मियाची तडजोडीची योजना भिकाजीपंताने तळयास असलेल्या

जमरूदच्या कानी घातली. सिद्दी जोहर या योजनेला मान्यता देणार नाही असे सांगून जमरूदने आपली एक तडजोड योजना सुचविली. छोटा मिया जंजिऱ्याच्या दौलतीचा धनी असावा आणि बाळू मियाने जोहरच्या विद्यमाने दंडा राजपुरीचा सुभा करावा, असा जमरूदच्या योजनेचा आशय होता. या वेळी बाळू मियाची काही माणसे भिकाजीपंताकडे आली होती. त्यांनी जमरूदची योजना मान्य केली. मग जमरूद व भिकाजीपंत या दोघांनी स्वतंत्र पत्रे लिहून ती योजना जोहरला कळविली. तेव्हा जोहरने त्याना साफ कळविले की, नुकताच त्याचा व पुणे दरबारचा जो करार झाला तो अंमलात आला पाहिजे; कराराप्रमाणे छोटा मिया जंजिऱ्याचे राज्य करेल व बाळू मिया राजपुरीस किंवा पुण्यास राहील; आपण बाळू मियाच्या उदरनिर्वाहाची सोय करून देऊ, पण राजपुरीचा सुभा त्याला देणार नाही, हेही जोहरने स्पष्ट केले.[१९]

जोहरने घेतलेल्या भूमिकेचा अर्थ उघड होता. छोटा मिया याला गादीवर बसवून तेथील सत्तेची सर्व सूत्रे स्वतःच्या हातात ठेवण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे प्रतिस्पर्धी बाळू मियाला जंजिऱ्याच्या कारभारात थोडेही स्थान देण्याची त्याची तयारी नव्हती. बाळू मियाबद्दल त्याचे मतही वाईट होते. त्याने स्वतःच्या वडिलाना खूप त्रास दिला, तसेच जंजिऱ्यातील अनेकांच्या मृत्यूस तो कारणीभूत झाल्याने, तेथील प्रजेत तो अप्रिय आहे, इत्यादी गोष्टी जोहरने मुंबई सरकारला लिहिल्या होत्या.[२०]

जोहरच्या वागण्याने बाळू मिया चिडला. आपल्या जनानखान्यातील काही बायकामुलांना त्याने इ. १७८५ च्या डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात तळयाला भिकाजीपंताकडे पाठवून दिले.[२१] नंतर जंजिरेकरांच्या मुलुखातील नांदगाव, मुरूड व माडतपा या गावांतील रयतेस मारपीट करून त्याने पैसे उकळले. तो टिपू सुलतानाच्या मुलखात जाणार अशी आवईही यावेळी उठली. तेव्हा सिद्दी जोहरने तळे येथे असलेल्या जमरूदकडे या बाबतीत विचारणा केली. यावर जमरूदने भिकाजीपंताकडे स्पष्टीकरण मागितले. बाळू मियाची बायकामुले तळयाला माझ्याकडे असताना तो टिपूकडे जाईलच कसा, असा प्रतिप्रश्न भिकाजीपंताने केला.[२२]

बाळू मियाचे पारिपत्य करण्यासाठी जोहरने आपली गलबते व महागिऱ्या सज्ज केल्या, त्याचप्रमाणे जंजिऱ्याचा सरनोबत सिद्दी इब्राहीम याला मुंबईला पाठवून बाळू मियाच्या हालचालीची कल्पना त्याने मुंबई सरकारला दिली. याच वेळी जोहरचे एक गलबत भात भरून घेऊन जंजिरा किल्ल्यात चालले होते. ते धरण्यासाठी बाळू मियाने आपली गलबते पाठविली. तेव्हा जोहरने जंजिरा किल्ल्यातून बाळू मियाच्या गलबतांवर तोफा डागल्या. बाळू मियाची गलबते जंजिऱ्याच्या राजकोटाच्या दक्षिणेस होती. बाळू मिया मात्र त्या गलबतांवर नव्हता.[२३]

बाळू मियाच्या कटकटी चालू असताना जोहरने जमरूदला तळयाला निरोप पाठविला. बाळू मिया जंजिऱ्याचा मुलूख खराब करीत आहे, राजकोटातील तोफा व

दारू गलबतांवर नेत आहे, आणि तुम्ही मात्र मजा पहात तळयात स्वस्थ बसून आहात, असा टोमणा जोहरने जमरूदला निरोपात मारला होता. तो सहन न होऊन, आपल्याबरोबरच्या सैनिकांपैकी शंभरजणांना जोहरच्या मदतीस राजपुरीस जाऊ द्यावे अशी जमरूदने भिकाजीपंताला विनंती केली. भिकाजीपंताने तसे न करण्याबद्दल जमरूदला सांगितले, तेव्हा, पुणे दरबारचा व जोहरचा नुकताच करार झालेला असतानाही, तो मोडून भिकाजीपंत बाळू मियाची बाजू घेत असल्याचा आरोप जमरूदने रागाने केला. इतकेच नव्हे, झालेला करार जोहर मान्य करणार नाही व आपणही जंजिऱ्यास जाणार नाही, असे तो म्हणू लागला. हे त्याचे निकराचे बोलणे ऐकून भिकाजीपंताने, जंजिरेकरांच्या प्रदेशास उपसर्ग न देता धाकट्या भावासह पुण्यास जावे, असे गोविंदराव माणकरामार्फत बाळू मियास सांगून पाठविले. मग केवळ जोहरच्या समाधानासाठी भिकाजीपंताने जमरूदचे शंभर सैनिक फक्त दोन कोस पुढे जाऊ दिले.[२४]

बाळू मियाबरोबर जंजिऱ्यातील काही लोक होते. जोहरने त्यांच्यापैकी काहीना आपल्या बाजूला वळवून घेऊन बाळू मियाला पकडण्याचा घाट घातला. या लोकांत बाळू मिया व जोहर या दोघांचीही बाजू घेणारे काहीजण होते. रेवदंडा, वीरवाडी, घोसाळे येथील मराठे सैनिक तळयाला जमले असून, ते बाळू मियाला कैद करणार आहेत, अशी अफवा त्यांनी उठविली. मग त्यानी बाळू मिया व छोटा मिया यांना एका गलबतात बसवून दूर घालवून दिले. भिकाजीपंताविषयीच्या अफवेमुळे बाळू मियाच्या मनात त्याच्याविषयी संशय निर्माण झाला. त्यामुळे पूर्वी ठरविल्याप्रमाणे तळयाच्या मार्गे न जाता सुवर्णदुर्गाच्या (हर्णै) मार्गाने पुण्याला जाण्याचा त्याने बेत केला.[२५]

बाळू मिया व छोटा मिया यांनी भिकाजीपंताच्या तथाकथित दुर्वर्तनाबद्दल पुण्याला तक्रार लिहून पाठविली. तेव्हा नाना व हरिपंत फडके यांनी, पुणे दरबारच्या मध्यस्थीने बाळू मिया–जोहर वाद आपसात सलोख्याने मिटविण्यासाठी, बाळू मियाला पुन्हा एकवार पुण्याला बोलाविले.[२६] पुण्याला जायचे बाळू मियाने ठरविले खरे, पण पुणे दरबारची मध्यस्थी स्वीकारल्यास आपल्याला मुलूख किंवा पैसा यांच्या स्वरूपात किंमत मोजावी लागेल, तसेच मराठ्यांचे वर्चस्व जंजिऱ्याच्या राजकारणात वाढेल, अशी त्याला भीती वाटत होती. म्हणून, आपले पूर्वापार मित्र असलेले इंग्रज आपल्याला मदत करतात का, हे पुण्याला जाण्यापूर्वी पुन्हा एकवार पाहण्याचे त्याने ठरविले.

नंतर २८ डिसेंबर १७८५ रोजी तो पाच गलबते व सहा–सात होड्या बरोबर घेऊन बाणकोटजवळील हरेश्वराच्या डोंगरानजीक गेला. स्वतः तेथेच राहून शेख हसन नावाच्या इसमाला त्याने रेसिडेंट फार्मरकडे पाठविले. बाळू मिया केवळ नाइलाजाने पेशव्याची मध्यस्थी स्वीकारण्यासाठी पुण्याला निघाला आहे, पण

इंग्रज जर त्याला मदतीचे आश्वासन द्यायला तयार असतील तर तो त्यांच्या आश्रयास यायला तयार आहे, असे शेख हसनने फार्मरला सांगितले. फार्मरने बाळू मियाबाबत २९ नोव्हेंबर १७८५ ला मुंबई सरकारला लिहिलेल्या पत्राला, महिना होऊनही, अजून त्या सरकारकडून उत्तर आलेले नव्हते. म्हणून, वरिष्ठांचे उत्तर येईपर्यंत आपण तुम्हाला कसलेच आश्वासन देऊ शकत नाही, तुमचा मार्ग तुम्हाला मोकळा आहे, असे फार्मरने हसनमार्फत बाळू मियाला कळविले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २९ डिसेंबरला, मुंबई कौन्सिलकडून फार्मरला त्याच्या पत्राचे उत्तर आले. बाळू मियाच्या बायकामुलांना दिलेले तात्पुरते संरक्षण यापुढे देऊ नये, बाळू मियाला कसलीही मदत करू नये, तसेच ईस्ट इंडिया कंपनीच्या शांततेच्या व अलिप्तपणाच्या नव्या धोरणास अनुसरून सिद्द्यांच्या अंतर्गत भांडणात पडू नये, अशा सूचना मुंबई कौन्सिलने आपल्या पत्रात दिलेल्या होत्या. बाळू मिया या वेळी सुवर्णदुर्गाच्या दिशेने फार दूर गेला नव्हता. फार्मरने मुंबई सरकारच्या सूचना एका माणसाकरवी त्याला कळविल्या.[२७]

बाळू मिया पेशव्याची मध्यस्थी स्वीकारण्यासाठी पुण्याला निघाल्याचे कळताच मुंबई कौन्सिलला वैषम्य वाटले. बाळू मिया व छोटा मिया यांना आपल्या हातातील प्यादी बनवून पुण्याचे ब्राह्मण जंजिरा घशात टाकणार असे कौन्सिलच्या सभासदांना वाटू लागले. पण या बाबतीत लष्करी उपाय योजणे त्यांना शक्य नव्हते. कारण इंग्रज-मराठ्यांच्या पहिल्या युद्धानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनी कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील सरकारांना एतद्देशीय सत्ताधाऱ्यांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करण्याचे व त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचे आदेश दिले होते. म्हणून, जंजिरेकरांच्या अंतर्गत वादात कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेता दोन्ही पक्षांत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करावा, असा ठराव मुंबई कौन्सिलने केला. त्यानुसार बाणकोटच्या रेसिडेंटामार्फत कौन्सिलने बाळू मियाला कळविले की तो जर मुंबईला येत असेल तर सिद्दी जोहरबरोबर त्याचा सलोखा आपण घडवून आणू.[२८] हा संदेश बाळू मियाला कळला त्या वेळी तो सुवर्णदुर्गाला पोहोचलेला होता.[२९] जानेवारी १७८६ चा हा सुमार होता.

बाळू मियाने बाणकोटच्या रेसिडेंटला उलट कळविले की, मुंबई कौन्सिलने माझ्या बाबतीत तुम्हाला पत्र पाठविले त्याच वेळी मुंबईला येण्याबद्दल मलाही स्वतंत्रपणे पत्र पाठविले असते तर मी तेथे गेलो असतो; पण आता पुणे दरबारशी माझी बोलणी झालेली असल्याने, सुवर्णदुर्ग सोडून मी मुंबईला जाऊ शकत नाही. पूर्वी आपल्या वडिलांना जंजिऱ्याचे राज्य मिळवून देण्यात इंग्रजांनी जशी मदत केली तशीच त्यानी आपल्यालाही करावी अशी बाळू मियाची अपेक्षा होती.[३०] पण त्या वेळचे इंग्रजांचे राजकीय धोरण आता बदललेले असल्याने, मुंबईकर इंग्रज त्याची बाजू घेणे शक्य नव्हते.

शेवटी नाइलाजाने व अनिच्छेने बाळू मिया सुवर्णदुर्गाहून पुण्याला गेला. तो पुण्याला केव्हा पोहोचला याची निश्चित तारीख उपलब्ध नाही. पण त्या बाबतीत अंदाज करता येतो. सर चार्ल्स मॅलेट याने पुणे दरबारचा इंग्रजांचा वकील म्हणून ३ मार्च १७८६ रोजी सूत्रे हाती घेतली. आपल्या आधी थोडे दिवस बाळू मिया व त्याचा भाऊ पुण्याला आल्याचा उल्लेख त्याच्या एका पत्रात आलेला आहे.[३१] यावरून बाळू मिया इ. १७८६ च्या फेब्रुवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात पुण्याला पोहोचला असावा असे दिसते.

बाळू मिया पुण्याला आल्यावर नानाने त्याची व त्याच्या भावाची पाषाणला राहण्याची व्यवस्था केली. मग त्याने बाळू मिया व जोहर यांच्यात तडजोड घडवून आणण्यासाठी एक योजना तयार केली. बाळू मियाने दंडा राजपुरीला राहून छोटा मिया वयात येईपर्यंत जंजिऱ्याचा कारभार पहावा आणि जोहरने जंजिरा किल्ल्याचा किल्लेदार म्हणून काम पहावे, अशी ती योजना होती. इ. १७६१ मध्ये, इंग्रजांच्या मध्यस्थीने झालेल्या मराठे–जंजिरेकर तहानुसार इंग्रज हे जंजिऱ्याचे रक्षणकर्ते होते. त्यामुळे आपली योजना त्यांच्या कानावर घालणे नानाला भाग होते. म्हणून नानाने आपली योजना मॅलेटमार्फत मुंबई कौन्सिलला कळविली.[३२] आणि कौन्सिलने ती सिद्दी जोहरकडे विचारार्थ पाठवून दिली.[३३] जोहरने नानाच्या योजनेला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. आपल्याशी नुकत्याच झालेल्या करारान्वये पुणे दरबारने बाळू मियाच्या वडिलांच्या मृत्युपत्राला मान्यता दिलेली आहे; त्या मृत्युपत्रानुसार छोटा मिया याला गादीवर बसवून आपणच जंजिऱ्याचा कारभार करू; बाळू मियाच्या चरितार्थाची सोय फक्त लावून देऊ, असे जोहरने मुंबई कौन्सिलला साफ कळविले. नानाची योजना जोहरला पसंत नाही हे कळताच मुंबई कौन्सिलने नानाला सूचना केली की, यापुढे पुढे दरबारने बाळू मियाला पाठिंबा देऊन जंजिऱ्याची कसलीही मसलत करण्याच्या भानगडीत पडू नये.[३४] छोटा मिया हाच जंजिऱ्याचा कायदेशीर वारस असल्याचे मुंबई कौन्सिलचे यावेळी मत बनले होते.[३५]

नानाची मध्यस्थीची योजना फेटाळली गेल्यावर त्याच्यासमोर एकच मार्ग होता, तो म्हणजे बाळू मियाची उघड बाजू घेऊन जंजिऱ्यावर हल्ला करणे. पण त्या बाबतीत मॅलेटने आपल्या राजकीय डावपेचाने त्याच्यावर मात केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या शांततेच्या नव्या धोरणास अनुसरून इंग्रजांना मराठ्यांशी मैत्रीचे संबंध हवे होते. त्यामुळे, पुणे दरबारने बाळू मियाची बाजू घेऊ नये अशी गर्भित इशारावजा सूचना मुंबई कौन्सिलने उघडपणे नानाला केली असली, तरी अंतःस्थपणे त्या कौन्सिलने असे ठरविले होते की, जर पेशव्याने बाळू मियाची बाजू घेऊन जंजिऱ्यावर हल्ला केलाच, तर मुकाटपणे तो मराठ्यांच्या ताब्यात जाऊ द्यायचा.[३६] मॅलेटला मुंबई कौन्सिलचे हे धोरण ठाऊक होते, पण त्याचा थांगपत्ता त्याने नानाला लागू दिला नाही. मराठ्यांनी जंजिऱ्यावर हल्ला केल्यास इंग्रज लष्करी कारवाई करतील

किंवा नाही याबद्दल स्पष्टपणे काहीही न सांगता, त्यांनी तसे केल्यास मराठ्यांशी इंग्रजांचे संबंध बिघडतील एवढेच मोघम वाक्य हेतुपुरस्सर मॅलेट नानाचा वकील बहिरोपंत मेहेंदळे याला ऐकवीत राहिला.[३७] मॅलेटच्या या धूर्तपणामुळे मुंबई सरकारचे जंजिऱ्याबाबतचे अलिप्ततेचे व शांततेचे धोरण नानाच्या लक्षातच आले नाही. म्हणून इंग्रजांच्या लष्करी कारवाईच्या खोट्या भीतीने, मनात असूनही,[३८] त्याने जंजिऱ्याविरुद्ध हल्ल्याची कसलीही योजना आखली नाही.

याचा परिणाम म्हणजे, बाळू मिया इ. १७८६ ते १७८९ पर्यंत तीन वर्षे पुण्यात पाषाणला माशा मारीत बसला. या तीन वर्षांच्या काळात पुण्यातील निरनिराळ्या बड्या धेंडांना भेटण्याखेरीज तसेच हरिपंत फडके याच्या सेवेत असलेल्या एका शिया मुसलमानाला सुन्नी करून घेण्यापलीकडे तो काहीच करू शकला नाही.[३९] बाळू मियाच्या दुर्दैवाने या काळात त्याची बाजू घेऊन जोहरविरुद्ध उठाव करणारा जंजिऱ्यात कोणीच निघाला नाही. म्हणून नानाचे काम अधिकच अवघड होऊन बसले. पुणे दरबारने प्रथम ७००० रुपये बाळू मियाला वैयक्तिक खर्चासाठी दिले, आणि मग त्याला दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन मॅलेटला दिले.[४०] बाळू मियाच्या पुण्यातील हालचालींवर नानाचे बारीक लक्ष होते. तो कोणाकोणाला केव्हा भेटला हे राघो भिकाजी हा नानाचा हस्तक नानाला वेळोवेळी कळवीत असे.[४१] बाळू मिया मॅलेटला अनेक वेळा भेटला, पण मॅलेटने मात्र, पुणे दरबारला संशयाला जागा नको, म्हणून धोरणीपणाने त्याची भेट घ्यायचे टाळले.[४२]

बाळू मियासारखा पांढरा हत्ती फार काळ फुकट पोसत राहणे पुणे दरबारला परवडण्यासारखे नव्हते. तसेच पुणे दरबारकडून मैत्रीची अपेक्षा करणाऱ्या मुंबई सरकारला बाळू मिया प्रकरणात फार ताणून धरणेही शक्य नव्हते. शेवटी इ. १७८९ च्या सुरुवातीस उभयपक्षांनी या प्रश्नी आपसांत तडजोडीचा मार्ग काढला. जंजिरा व बाळू मिया यांच्यासंबंधीचा निर्णय कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल कॉर्नवालिस याच्यावर सोपवावा, असे त्यांनी ठरविले.[४३]

लॉर्ड कॉर्नवालिस हा वॉरन हेस्टिंग्जपेक्षा अधिक सरळ व उदारमतवादी होता. पेशवा जर सर्व जंजिरा प्रदेशाच्या एकूण उत्पन्नाइतकी जहागीर बाळू मिया व छोटा मिया यांना स्वतःच्या प्रदेशात दुसरीकडे द्यावयाला तयार असेल, तर पुणे दरबारला, त्याला हव्या त्या मार्गाने जंजिरा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आणण्यास आपण परवानगी देऊ, असे त्याने नानाला कळविले.[४४]

कॉर्नवालिसचा जंजिऱ्याबाबतचा निर्णय पुणे दरबारला आश्चर्याचा धक्का देणारा होता. पण त्याने तसा निर्णय घेण्यामागे तीन प्रमुख कारणे होती. पहिले म्हणजे, छोटा मिया याला जंजिऱ्याच्या गादीवर बसवून आपण केवळ त्याचा कारभारी राहू, असे वारंवार इंग्रजांना लिहिणाऱ्या सिद्दी जोहरने आपला शब्द मोडला. इ. १७८७ मध्ये त्याने स्वतःच जंजिऱ्याची गादी बळकावली. पुढे तो

इ. १७९० मध्ये मरण पावल्यावर सिद्दी अब्राहम गादीवर बसला. कॉर्नवालिसच्या मते जोहर व अब्राहम या दोघांनाही जंजिऱ्याच्या गादीवर बसण्याचा कायदेशीर हक्क नव्हता. बाळू मिया व छोटा मिया हे दोघे खरे कायदेशीर वारस असल्याने आणि ते निराश्रित अवस्थेत जीवन जगत असल्यामुळे, त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, असे कॉर्नवालिसला वाटले.[४५] दुसरे कारण म्हणजे, थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत, इ. १७६१ मध्ये, इंग्रजांच्या मध्यस्थीने झालेल्या मराठे-जंजिरेकर तहानुसार इंग्रज हे जंजिऱ्याचे पालक व रक्षणकर्ते होते. रक्षणकर्ते या नात्याने इंग्रजांनी सिद्द्यांच्या अंतर्गत कलहांत पूर्वी अनेकवार मध्यस्थी केली होती. पण सिद्दी याकूत व सिद्दी इब्राहीम, सिद्दी याकूत व सिद्दी अब्दुल रहीम यांच्या भांडणांत मध्यस्थी करताना इंग्रजांचे हात पोळले. काही वेळा मध्यस्थी अपयशी ठरून त्यांना मनस्ताप सहन करावा लागला. सिद्द्यांमध्ये वारंवार होणाऱ्या भांडणाना व त्यातील मध्यस्थीला इंग्रज कंटाळले होते. साहजिकच जंजिऱ्याच्या जबाबदारींतून मुक्त व्हावे असे कॉर्नवालिसला वाटत होते. तिसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे, ईस्ट इंडिया कंपनीच्या नव्या धोरणान्वये, कॉर्नवालिसला मराठ्यांशी मैत्री हवी होती. ती साधावयाची तर मराठ्यांविरुद्ध सिद्द्यांना मदत करण्याचे इंग्रजांचे पूर्वापारचे धोरण कॉर्नवालिसला सोडून देणे भाग होते. बाळू मिया व छोटा मिया यांची पेशव्याकडून योग्य ती व्यवस्था लावून घेऊन पुणे दरबारला जंजिरा आपल्या ताब्यात घेण्याची परवानगी दिली तर इंग्रजांची प्रतिष्ठा राखून सिद्दी व मराठे दोघांशीही मैत्रीचे संबंध राहतील असे कॉर्नवालिसला वाटत होते. म्हणूनच, जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात जाणे इंग्रजांना इष्ट नाही असे मनात वाटत असूनही त्याने पुणे दरबारला जंजिऱ्याबाबत वरील सवलत देऊ केली.

यानंतर इंग्रजांच्या दृष्टीने एक गंभीर घटना घडली. बाळाजीपंत गोरे, लक्ष्मणपंत, रामजी राव, रावजी कंक व बाबूराव परशुराम इत्यादी सुवर्णदुर्ग प्रदेशातील मराठ्यांच्या अधिकाऱ्यांनी होडयांतून हजारबाराश सैनिक बाणकोटच्या हद्दीत गुप्तपणे घुसवून जंजिरेकरांचा मदगड किल्ला ताब्यात आणण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.[४६] कॉर्नवालिसने या घटनेची गंभीर दखल घेतली. त्याने पुणे दरबारला कळविले की, बाळू मियासाठी योग्य ती तरतूद करून जंजिरा ताब्यात घेण्याची मुभा तुम्हाला देण्याचा उदारपणा मी दाखविला; त्याचा अव्हेर करून, मॅलेटला कसलीही पूर्वसूचना न देता, तुम्ही आमच्या हद्दीचा भंग करून मदगड घेण्याचा प्रयत्न केला; सदरहू कृत्य म्हणजे मराठे–इंग्रज करारांचा भंग तर आहेच, पण तो माझा व माझ्या राष्ट्राचा अपमान आहे. कॉर्नवालीस इतकेच करून थांबला नाही. मराठ्यांना धडा शिकविण्यासाठी, त्याने जंजिरा घेण्याबाबत मराठ्यांना दिलेली सवलत आपण रद्द करीत असल्याचे मॅलेटमार्फत पुणें दरबारला जाहीर केले. तसेच आपण जंजिऱ्याच्या बाबतीत इ. १७६१ चा मराठे–जंजिरेकर तह पुन्हा लागू करून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली आहे.

असे त्याने नानाला कळवले.[४७] या सर्व घटना मे ते ऑक्टोबर १७८९ च्या दरम्यान घडल्या.

कॉर्नवालिसने जंजिऱ्याबाबतची रद्द केलेली सवलत पुन्हा मराठ्यांना द्यावी म्हणून पुणे दरबारची खटपट सुरू झाली. कॉर्नवालिसनें तसे करण्याच्या बाबतीत मुद्दाम थंडपणा स्वीकारला. इंग्रजांची आगळीक केली तर काय होते हे पुणे दरबारच्या लक्षात त्याला आणून द्यायचे होते. पण याच सुमारास हिंदुस्थानातील राजकारणाचे रंग भराभर पालटत गेले. इ. १७८९–९० च्या दरम्यान इंग्रज व टिपू सुलतान यांच्या संघर्षास दक्षिणेंत मोठी धार चढली. टिपूसारख्या जबरदस्त शत्रूशी सामना द्यायचा तर मराठे व निजाम यांना आपल्या गटात ओढले पाहिजे हे कॉर्नवालिस व मॅलेट या दोघांनी ओळखले. म्हणून मराठ्यांच्या मैत्रीपुढे जंजिऱ्याचे राजकारण व त्या बाबतीत मराठ्यांनी केलेली इंग्रजांची अप्रतिष्ठा यांना त्यांनी दुय्यम स्थान दिले. मराठ्यांना इंग्रजांच्या बाजूला ओढण्यासाठी, जंजिऱ्याबाबतची रद्द केलेली सवलत आपण पुन्हा एकवार मराठ्यांना देत असल्याचे कॉर्नवालिसनें एप्रिल १७९० मध्ये पुणे दरबारला कळविले. मॅलेटनेही कॉर्नवालिसला या बाबतीत योग्य ती साथ दिली. दोघांच्या धोरणीपणाचा इंग्रजांना फायदा झाला. नानाचा इंग्रजांबद्दल अनुकूल ग्रह होऊन, आणखी दोन महिन्यांनी, म्हणजे जून १७९० मध्ये टिपूविरुद्ध त्याने इंग्रजांशी मैत्रीचा तह केला. नाना टिपूविरुद्ध इंग्रजांना सामील होण्यात, इतर काही गोष्टींप्रमाणेच, बाळू मिया प्रकरणात कॉर्नवालिसने स्वीकारलेल्या धोरणाचाही महत्त्वाचा भाग होता, हे लक्षात ठेवले पाहिजे.

पुणे दरबारला जंजिरा ताब्यात घेण्याची सवलत पुन्हा देताना कॉर्नवालिसने दोन अटी घातल्या. त्यातील एक अट पूर्वीचीच होती. ती म्हणजे, बाळू मिया व त्याच्या भावाला पुणे दरबारने दुसरीकडे जंजिऱ्याच्या एकूण उत्पन्नाइतकी जहागीर द्यावी. ही नवीन जहागीर ताब्यात घेण्यासाठी बाळू मियाला जो खर्च येईल त्यासाठी त्याला चाळीस हजार रुपये रोख देण्यात यावेत, अशी त्याची दुसरी अट होती.[४८] कॉर्नवालिसने पुणे दरबारला हेही कळविले की, मराठ्यांनी जंजिऱ्याचे राज्य आपल्या ताब्यात घेण्यापूर्वी जर बाळू मिया किंवा छोटा मिया यांपैकी कोणालाही जंजिऱ्याचे राज्य मिळाले, तर मग आपण जाहीर केलेली सवलत लागू होणार नाही.[४९]

कॉर्नवालिसच्या सर्व अटी नानाने मान्य केल्याने, ६ जून १७९१ रोजी मॅलेटच्या मध्यस्थीने सवाई माधवराव व बाळू मिया यांच्यात ऐतिहासिक महत्त्वाचा तह घडून आला. त्यातील महत्त्वाची कलमें पुढीलप्रमाणे होती : सिद्दी बाळू मियाने तहाच्या वेळेस जंजिरेकरांच्या ताब्यात जेवढा मुलूख होता त्या सर्व मुलखावरील आपला स्वामित्वाचा कायदेशीर अधिकार सोडून तो पेशवा सवाई माधवराव यास द्यावा; त्याबद्दल पुणे दरबारने जंजिरा राज्याच्या एकूण उत्पन्नाइतकी सलग मुलूख असलेली जहागीर बाळू मियाला वंशपरंपरेनें गुजरातमधील समुद्रकाठच्या प्रदेशात द्यावी;

गेल्या दहा वर्षांत सर्वात जास्त उत्पन्न ज्या वर्षी जंजिऱ्याच्या मुलखात आले ते वर्ष नवीन जहागिरीचे उत्पन्न ठरविण्यासाठी ग्राह्य धरावे; द्यावयाच्या एकूण जहागिरीपैकी वार्षिक ७५,००० रु. उत्पन्नाचा मुलूख पुणे दरबारने तावडतोब अलतमघा (राजमुद्रेनिशी दिलेली कायमची जहागीर) म्हणून बाळू मियाला द्यावा; बाकीची जहागीर, पेशव्याच्या हातात त्याच वर्षी जंजिऱ्याचा सर्व प्रदेश पडल्यावर देण्यात यावी; बाळू मियाने आपल्या सर्व नातेवाइकांसह व नोकरांसह नवीन जहागिरीत कायम रहावे; जहागिरीजवळील मराठ्यांच्या किंवा इंग्रजांच्या मुलुखाला त्याने उपसर्ग देऊ नये, तसेच दोघांविरुद्ध शत्रुत्वाचे कसलेही कृत्य करू नये; पुणे दरबारने त्याला हव्या त्या मार्गाने जंजिऱ्याचा प्रदेश आपल्या ताब्यात घ्यावा; तसे त्याने केल्यास इंग्रज सरकार जंजिरेकराना कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणार नाही. याप्रमाणे तह ठरल्यावर त्याच्यावर सह्या झाल्या ६ जून १७९१ रोजी व तहाच्या प्रतींची देवाणघेवाण झाली १२ जून १७९१ रोजी ! हा फरक पडण्याचे कारण म्हणजे, ६ जून रोजी शनिवारवाड्याला आग लागल्याने, त्या दिवशी तहाच्या प्रतींची देवाणघेवाण होऊ शकली नाही.[५०]

हा तह घडवून आणल्यावर जंजिऱ्याच्या जबाबदारीतून मुक्त झाल्याचा निःश्वास मॅलेटने सोडला.[५१] या तहात ठरल्याप्रमाणे पुणे दरबारने बाळू मियास सुरतेजवळ सतरा गावांची वार्षिक ७५,००० रुपये उत्पन्न देणारी जहागीर नेमून दिली. तसेच कॉर्नवालिसच्या अटीनुसार बाळू मिया व छोटा मिया यांना ४०,००० रुपये रोख व इतर बहुमानदर्शक नजराणे दिले.[५२] तहानंतर तीनचार महिन्यांनी बाळू मिया आपल्या नवीन जहागिरीत गेला. त्याने सचिन या गावी कायमचे वास्तव्य केले. पुढे शाहअलम बादशहाकडून त्याने 'नवाब' ही पदवी मिळविल्यावर त्याला व त्याच्या वंशजांना सचिनचे नवाब असे म्हटले जाऊ लागले.[५३] बाळू मिया इ. १८०२ मध्ये मृत्यू पावला.[५४]

कॉर्नवालिसने जंजिरा ताब्यात घेण्याबद्दल मराठ्यांना दिलेल्या सवलतीचा फायदा उठवून नानाने बाळू मियाशी तह केला. त्यामुळे जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात येण्याच्या मार्गातील इंग्रजांचा अडसर दूर होऊन जंजिऱ्यावर मराठ्यांचे कायदेशीर स्वामित्व (De jure sovereignty) प्रस्थापित झाले खरे, पण प्रत्यक्षात जंजिरा मराठ्यांच्या हाती पुढे कधीच न आल्याने हे कायदेशीर स्वामित्व कागदावरच राहिले. गंमत अशी की इंग्रजांनी मात्र, एकही लढाई न करता जंजिरा व सचिन या दोन्ही ठिकाणच्या नवाबांना काही काळानंतर आपल्या संरक्षणाखाली आणले. अखेरीस मराठ्यांचे राज्य नष्ट झाले, पण जंजिऱ्याचा नवाब इ. १९४७ पर्यंत शिल्लक राहिला.

तसे पाहिल्यास सिद्दी बाळू मिया प्रकरण अठराव्या शतकातील हिंदुस्थानच्या एकूण राजकीय इतिहासाचा विचार करता किरकोळ वाटते. परंतु या प्रकरणात इंग्रज

व मराठे जे राजकारणी डाव खेळले त्यांचा परिणाम अठराव्या शतकाच्या अखेरीच्या हिंदुस्थानच्या राजकारणावर निश्चितपणे झालेला आहे. त्या काळात भारतीय राजकारणास विशिष्ट दिशा देणाऱ्या ज्या काही महत्त्वाच्या घटना घडल्या त्यांत सिद्दी बाळू मिया प्रकरण ही एक आहे. म्हणून त्यात व्यक्त झालेल्या इंग्रजांच्या व मराठ्यांच्या मुत्सद्देगिरीचा तुलनात्मक विचार करणे आवश्यक ठरते.

लॉर्ड क्लाइव्ह याने इंग्रजी सत्तेचा पाया हिंदुस्थानात घातला व वॉरन हेस्टिंग्जने तो भक्कम केला. आपले कार्य साधताना हेस्टिंग्जने भल्याबुऱ्या मार्गांचा विधिनिषेध बाळगला नाही. एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या अंतर्गत प्रश्नांत हस्तक्षेप करून त्याने त्यांचा रोष इंग्रजांविरुद्ध ओढवून घेतला. तसेच पैशाच्या बाबतीत तो ढिलाईने वागल्याने, इंग्रजांच्या सार्वजनिक चारित्र्याबद्दलची प्रतिमा तत्कालीन हिंदी राजेरजवाड्यांच्या दृष्टीने डागळली गेली. ती उजळून इंग्रजांचे राज्य पुढेमागे हिंदुस्थानात वाढण्याच्या दृष्टीने स्थिर पायावर उभे करण्याची जबाबदारी कॉर्नवालिस व मॅलेट या दोघांवर होती. दोघेही कसलेले मुत्सद्दी असून एकमेकांना पूरक होते. त्यांचे राजकारण साधण्याचे मार्ग हेस्टिंग्जप्रमाणे दंडेलीचे नसून, सभ्यता व प्रतिष्ठा यांना धरून होते. अकबर व औरंगजेब यांच्या राजकारणात जो फरक होता तोच हेस्टिंग्ज व कॉर्नवालिस यांच्यात होता.

इंग्रज–मराठ्यांच्या पहिल्या युद्धाच्या वेळी वॉरन हेस्टिंग्जने मराठ्यांच्या अंतर्गत राजकारणात अकाली हस्तक्षेप केल्याने इंग्रजांना हवे ते यश मिळू शकले नाही. पण झालेल्या चुकांपासून बोध घेऊन त्या सुधारणे हे खऱ्या मुत्सद्देगिरीचे लक्षण होय. ते कॉर्नवालिस व मॅलेट यानी दाखविले. भावी काळात हिंदुस्थानवर वर्चस्व गाजविण्याच्या बाबतीत मराठे हेच आपले खरे प्रतिस्पर्धी आहेत, पण सध्या त्यांच्याशी वैर करण्यात अर्थ नाही, हे दोघांनी बरोबर ओळखले. त्यांच्याशी तात्पुरती मैत्री साधून, इंग्रजांच्या इतर शत्रूंना नामोहरम करायचे आणि मराठी राज्यावर अखेरचा आघात करण्याची वेळ येईपर्यंत वाट पहात बसावयाचे, हे शहाणपणाचे धोरण कॉर्नवालिस व मॅलेट यांनी अंगीकारले. हेस्टिंग्जचे दंडेलीचे राजकारण नानाला सहज उमजले. त्यामुळे इंग्रज व मराठे यांच्यातील पहिल्या युद्धाच्या वेळी प्रखर इंग्रजविरोधी भूमिका घेऊन हेस्टिंग्जचे डावपेच त्याने काही प्रमाणात तरी हाणून पाडले. पण सभ्यतेने व सुसंस्कृतपणे राजकारण खेळणाऱ्या मॅलेट व कॉर्नवालिस यांचे धूर्तपणाचे डावपेच ओळखण्यात नानाच्या बुद्धिमत्तेची खरी कसोटी होती. पण या कसोटीत नाना उणा पडला.

वस्तुतः जंजिऱ्याचे भौगोलिक, आरमारी व सागरी व्यापारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मोक्याची जागा म्हणून असलेले महत्त्व कॉर्नवालिस व मॅलेट पूर्णपणे जाणून होते. त्यामुळे तो मराठ्यांच्या हातात जाऊ नये असे मनातून त्यांना खूप वाटत होते. पण बाळू मिया प्रकरणाच्या वेळी दोघांनाही इंग्रजी राज्याच्या

हिताच्या दृष्टीने मराठ्यांशी मैत्री अधिक महत्त्वाची वाटत होती. तशात इ. १७९० मध्ये इंग्रजांचा टिपूशी संघर्ष निर्माण झाल्यावर, मराठ्यांना आपल्या गोटात ओढण्यासाठी त्यांच्याशी मैत्री साधण्याला त्यांनी सर्वाधिक महत्त्व देऊन जंजिऱ्यावर उदक सोडले. म्हणजेच जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात जाऊ न देण्याचे इंग्रजांचे अनेक वर्षांचे जुने धोरण सोडून, तो ताब्यात घेण्याची सशर्त परवानगी त्यांनी मराठ्यांना दिली. याचा अर्थ, टिपूचे राजकारण अखिल भारताच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, तर जंजिऱ्याचा प्रश्न स्थानिक स्वरूपाचा आहे हे त्यांनी बरोबर ओळखले. मराठ्यांच्या दृष्टीने पाहिल्यास जंजिरा महत्त्वाचा होता खरा, पण टिपूचे प्रकरण त्याहून अधिक महत्त्वाचे होते. जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात आणखी काळ न आल्याने मराठी राज्यावर आकाश कोसळले नसते, तथापि टिपूच्या प्रकरणावर सबंध मराठी राज्याचे हिताहित अवलंबून होते. नाना फडणीस ही गोष्ट ओळखू न शकल्याने त्याने जंजिऱ्याला अवास्तव महत्त्व दिले.

इंग्रज-मराठ्यांच्या पहिल्या युद्धाच्या वेळी, हिंदुस्थानात स्वतःचे राजकीय वर्चस्व स्थापण्याचा इंग्रजांचा उद्देश स्पष्टपणे उघड झाला होता. म्हणून तर नानाने चौकडीचा संघ इंग्रजांविरुद्ध उभारण्यात खूप खटपट केली होती. तसेच हैदरला डावलून सालबाईचा तह होता कामा नये म्हणून त्याने वर्ष दीड वर्ष महादजीशी वाद घातला होता. याच संदर्भात, हैदर हा मराठ्यांचा कितीही मोठा शत्रू असला तरी तो एतद्देशीय शत्रु असून, परकीय इंग्रज हे मराठ्यांचे खरे शत्रू आहेत, अशा अर्थाचे उद्‌गार नानाने काढले होते.[५५] मग हेच धोरण त्याने टिपूलाही लावून, त्याच्याशी तात्पुरती मैत्री साधून इंग्रजांविरुद्ध आघाडी उभारणे आवश्यक होते. तसे झाल्यास इंग्रजांच्या दक्षिणेतील अस्तित्वालाच धोका पोहोचण्याचा संभव होता. पण मराठ्यांशी मैत्री हा मराठेशाहीवर योग्य वेळी आघात करण्यासाठी इंग्रजांनी तात्पुरता घतलेला पवित्रा होता हे नाना ओळखू शकला नाही. त्यामुळे इंग्रजांशी जवळीक साधून जंजिरा हस्तगत करणे त्याला महत्त्वाचे वाटले. त्याचा हा दोष बरोबर हेरून कॉर्नवालिसने धूर्तपणाने जंजिऱ्याचे आमिष दाखवून नानाचा मासा आपल्या गळाला लावला. जंजिऱ्याच्या लोभाने नाना टिपूविरुद्ध इंग्रजांनी उभारलेल्या त्रिवर्गाच्या आघाडीत सामील झाला. नानाच्या चुकीच्या धोरणाचा व्हायचा तोच दुष्परिणाम झाला. मराठे व निजाम यांच्या मदतीने इंग्रजांनी टिपूचे कंबरडे मोडल्याने, दक्षिणेत इंग्रजांवर अंकुश ठेवणारी प्रबळ सत्ता नष्ट झाली. परिणामी इंग्रज-मराठ्यांच्या पहिल्या युद्धाअखेरीस त्या दोन्ही सत्तांमध्ये असलेला लष्करी सामर्थ्याचा समतोल ढासळला. आपुढे इंग्रजांचे पारडे हळूहळू जड होत जाऊन त्यांनी मराठ्यांचे राज्य गिळंकृत केले. यावरून, बाळू मिया प्रकरणात कॉर्नवालिस व मॅलेट हे मुत्सद्देगिरीत नानापेक्षा सरस ठरले असे म्हणावे लागते.

बाळू मिया प्रकरणात नानाच्या राजकारणपटुत्वाला कमीपणा आणणारी एक

घोडचूक त्याच्या हातून झालेली आहे. सवाई माधवराव– बाळू मिया तहातील एक महत्त्वाचे कलम म्हणजे, बाळू मियास पुणे दरबारने ७५,००० रु. वार्षिक उत्पन्नाची कायमची जाहगीर ताबडतोब द्यावी व बाकीची जंजिरा त्याच वर्षी मराठयांच्या ताब्यात आल्यावर त्याला देण्यात यावी. यावरून आपला समज असा होतो की, जंजिरा घेण्याची एखादी मोठी योजना नानाने आधीच आखून ठेवली असावी व त्यामुळे मोठया आत्मविश्वासाने त्याने हे कलम बाळू मियाशी झालेल्या तहात घातले असावे. पण प्रत्यक्षात जंजिरा घेण्याची कसलीच योजना नानाने आखली नव्हती, तसेच जंजिरा घेण्याचा त्याने एकदाही प्रयत्न करून पाहिला नाही. मग 'त्याच वर्षी जंजिरा मराठयांच्या ताब्यात आल्यावर' या शब्दांतून प्रगट होणारा आत्मविश्वास नानाने कशाच्या जोरावर बाळगला? बलशाली आरमाराच्या जोरावर म्हणावे तर सिद्दीचे आरमार मराठी आरमारापेक्षा अजूनही वरचढ होते. जंजिऱ्यामध्ये सिद्दी जोहरविरुद्ध असलेला कोणी बाळू मियाला मदत करेल या अपेक्षेने म्हणावे, तर इ. १७८६ मध्ये बाळू मिया पुण्याला आल्यापासून त्याच्याशी पेशव्याचा तह होण्यापर्यंत चारपाच वर्षांच्या काळात, बाळू मियाला पाठिंबा देणारा जंजिऱ्यात कोणीही नाही हे नानाच्या अनुभवास आले होते. त्यामुळे असे वाटते की, शिवाजीच्या काळापासून अनेक प्रयत्न करूनही जंजिरा मराठयांच्या ताब्यात येत नाही हे पाहिल्यावर, तो कोणत्या तरी मार्गाने पदरात पाडून घ्यावा या विचाराने केवळ अगतिक होऊन नानाने बाळू मियाशी तह केला असावा.

ज्या जंजिऱ्यासाठी नानाची यातायात चालली होती त्याच्या बाबतीत इंग्रजांनी अंग काढून घतल्यावरही नानाला तो घ्यायचा प्रयत्न करावयाचा नव्हता तर मग त्याने बाळू मियाशी तह केला कशाला असा प्रश्न पडतो. तहापायी मराठयांना निष्कारण वार्षिक ७५,००० रु. उत्पन्नाचा सुरतेजवळचा सुपीक व व्यापारीदृष्टया उपयुक्त मुलूख गमवावा लागला. बरे, बाळू मिया मराठयांशी नीट वागला म्हणावे तर तसेही दिसत नाही. मराठयांबरोबरच्या तहातील मैत्रीसंबंधीचे कलम मोडून सुरतेजवळील मराठयांच्या मुलुखात त्याने चांगलाच धुमाकूळ घातला आणि पुणे दरबारला तसेच गुजराथच्या गायकवाडांना चांगलीच डोकेदुखी निर्माण केली. त्यासंबंधीची हकीगत ईस्ट इंडिया कंपनीच्या पत्रव्यवहारातून वाचण्याजोगी आहे. थोडक्यात म्हणजे, ज्या जंजिऱ्यासाठी नानाने तह केला तो तर पदरात पाडून घेतला नाहीच, उलट सचिनचा नवा नबाब निर्माण करून मराठी राज्याचे आणखी नुकसान मात्र करून घेतले.

जंजिरेकरांचे वरचढ आरमार ही जंजिरा जिंकून घण्याच्या बाबतीत नानासमोरील मोठी अडचण होती खरी. तशातच इंग्रजांच्या मदतीने आंग्रयांचे आरमार नष्ट करण्याची जी चूक नानासाहेब पेशव्याने काही वर्षांपूर्वी केली होती ती मराठयांना अजूनही भोवत होती. तरीसुद्धा या प्राप्त परिस्थितीत नाना एक गोष्ट

निश्चितपणे करू शकत होता. पूर्वी ज्याप्रमाणे, पोर्तुगिजांचे आरमार मराठ्यांच्या आरमारापेक्षा प्रबळ असतानाही, चिमाजी आप्पाने भूयुद्धात पोर्तुगिजांना नेस्तनाबूत करून त्यांच्याकडे फक्त गोवे व आसपासचा प्रदेश ठेवला, त्याप्रमाणे जंजिरेकरांच्या बाबतीत नाना करू शकला असता. आपल्या सरदारांकरवी जंजिऱ्यावर मोठी मोहीम काढून जंजिरेकरांचा जमिनीवरील सर्व मुलूख जिंकून नाना सिद्दींची कोंडी करू शकला असता. अशा तऱ्हेची कोंडी इ. १७६१ मध्ये रामाजी महादेव बिवलकराने यशस्वीरीत्या केली होती व त्या वेळी इंग्रजांनी ऐन वेळी मदत केल्यानेच जंजिरेकर मराठ्यांच्या तडाक्यातून वाचले होते.

जंजिऱ्याची कोंडी करण्याचे काम नाना इ. १७९१ ते १७९५ या काळात, म्हणजे त्याचे राजकीय स्थान भक्कम असताना करू शकला असता. जंजिऱ्याच्या बाबतीतील इंग्रजांचा अडसर दूर झाल्याने तर त्याचे काम पूर्वीपेक्षा सोपे झाले होते. फार तर पोर्तुगिजांच्या मदतीने सिद्दी जंजिऱ्याचा किल्ला स्वत:च्या हाती ठेवू शकले असते. पण त्यांचा बाकीचा मुलूख मराठ्यांनी घेतल्यावर ते पोर्तुगिजांप्रमाणे निरुपद्रवी झाले असते. जंजिऱ्याच्या मोहिमेसाठी मराठ्यांना वेळ, पैसा व माणसे यांची मोठी किंमत द्यावी लागली असती हे खरे, पण त्याच्यासाठी बाळू मियाशी तह करण्याची चूक एकदा केल्यानंतर, पडेल ती किंमत देऊन तो नानाने पदरात पाडून घेणे आवश्यक होते. पण जंजिऱ्यावर दीर्घकालीन मोहीम काढावयास योजकता, चिकाटी व धडाडी ह्या चिमाजी आप्पाच्या गुणांची जरुरी होती. नानाच्या अंगी या गुणांचा अभाव होता. म्हणून जंजिऱ्याच्या बाबतीतील इंग्रजांचा अडसर दूर करण्याचा त्याने दाखविलेला संधिसाधुपणा हा केवळ कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार ठरतो.

